

**श्री ज्ञानेश्वरी**

**अध्याय दुसरा**

हा अध्याय फार महत्वाचा व मोठा आहे. यात भगवंतांनी सांख्ययोगाचे विवरण केले आहे म्हणून याला सांख्ययोग म्हटले आहे. पण यात केवळ सांख्ययोगच नसून पुढील पंधरा अध्यायाची बीजे पेरलेली आहेत.सुरवातीला अर्जूनाचे युद्ध न करण्याचे समर्थन चालुच आहे आणि 11 व्या श्लोकापासून भगवंत उपदेशाला सुरवात करतात. एक योगायोग म्हणजे या उपदेशाची व वेदांच्या पहिल्या ऋचेची सुरवात अकारापासूनच आहे.38 व्या शलोकापर्यंत भगवंत सांख्ययोग म्हणजे ज्ञानमार्ग सांगतात नंतर कर्मयोगाचे विवेचन सुरु होते. या विवेचनाचे दरम्यान स्थितिप्रज्ञाचे लक्षण पण येते. यातले बरेच श्लोक सुभाषिते म्हणून वापरतात.

यांत 72 श्लोक असून त्यावर 375 ओव्या आहेत.

यातील 71,199 या ओव्या फार  सुंदर आहेत.

या अध्यायातील काही श्लोकांवर महाराजांनी टीका करणे हेतुपूर्वक टाळले आहे असे वाटते किंवा काही श्लोकांवर थोड्या रुढ अर्थाने विवेचन केले आहे जसे 5,16,29, 44,46,59,64. या श्लोकांवरचे टिळकांचे भाष्य थोडे वेगळे आहे.

**श्री ज्ञानेश्वरी**

**अध्याय दुसरा**

**संजय उवाच**

**तं तथा कृपयाऽऽविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम्**
**विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदन : ।।1।।**

**संजय म्हणाला- याप्रमाणे करुणेने व्यापिलेल्या, अश्रूंनी डोळे दाटून आलेल्या, आणि विषाद पावणाऱ्या त्या अर्जुनास मधुसुदन असें भाषण करते झाले.**

मग संजयो म्हणे रायातें । 'आईके , तो पार्थु तेथें ।
शोकाकुल ; रुदनातें । करितु असे ।। 1।।
तें कुळ देखोनि समस्त । स्नेह उपनलें अद्भुत ।
तेणें द्रवलें असे चित्त । कवणेपरी ? ।। 2।।
जैसे , लवण जळे झळंबले ,। ना तरी , अभ्र वाते हाले ।
तेसे , सधीर [1] , परी विरमले । हृदय तयाचें ।।3।। 1 गंभीर
म्हणौनि कृपा आकळिला ,। दिसतसे अति कोमाइला [2] ! 2. कोमजलेला
जैसा , कर्दमी रूपला । राजहंस ।।4।।
तयापरी तो पांडुकुमरु ।महामोहे अति जर्जरु ।
देखोनि , श्रीशाङ्गर्धरु । काय बोले ? ।।5।।

**श्री भगवान् उवाच**

**कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।**
**अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ।। 2।।**

**श्रीभगवान म्हणाले- हे अर्जुना ! आर्यांनीं म्हणजे सत्पुरुषांनीं कधीहि न आचरिलेले अधोगतीला नेणारे आणि दुष्कीर्तिकारक असे हे काळेबेरे या संकटसमयीं तुझ्या मनात कोठून आले ?**

म्हणे , " अर्जुना ! आदि पाहीं । हे उचित काय इये ठायीं ? ।
तूं कवण ? हें कायी । करीत आहासी ? ।।6।।
तुज सांगे काय जाहले ? । कवण उणे आले ?।
करितां , काय ठेलें [3]? । खेदु कायिसा ? ।।7।। 3आरंभ केलेले कार्य
तूं अनुचिता चित्त नेदिसी , । धीरु कहीं न संडिसी , । थांबले
तुझेनि नामें , अपयशी । दिशा लंघिजे! [4]।।8।। 4 पळणे
तूं शूरवृत्तीचा ठावो । क्षत्रियामाजीं रावो [5] । 5 श्रेष्ठ
तुझिया लाठेपणाचा [6] आवो [7] । तिहीं लोकीं।।9।। 6 पराक्रमाचा 7डंका

तुवां संग्रामीं हरु जिंकिला ,। निवात-कवचांचा ठावो फेडिला [1] । 1.लपून राहून देवांना त्रास
पवाडा [2] तुवा केला । गंधर्वासी ।।10।। देणाऱ्या राक्षसांचा ठाव-
पाहता तुझेनि पाडे ,। दिसे त्रैलोक्यही थोकडे ! । ठिकाणा नष्ट केला 2पराक्रम
ऐसे पुरुषत्व चोखडे । पार्था तुझे ।।11।।
तो तूं , कीं , आजि एथें । सांडूनियां वीरवृत्तीते ।
अधोमुख , रुदनाते । करितु आहासी ! ।।12।।
विचारी तूं अर्जुनु ! । कीं , कारुण्ये किजसी दीनु ! ।
सांग पा ! अंधकारे भानु । ग्रासिला आथी ? ।।13।।
ना तरी , पवनु मेघासी बिहे ? ।की ,अमृतासी मरण आहें ? ।
पाहें पां ! इंधनचि गिळोनि जाये ।पावकाते [3] ?।।14।। 3 अग्नी.
कीं, लवणेचि जळ विरे ? । संसर्गे काळकुट मरे ?।
सांग पा , महाफणी [4] , दर्दुरे [5] । गिळिजे कायी ? ।।15।। 4 नाग 5 बेडुक
सिंहासी झोंबे कोल्हा ?। ऐसा अपाडु [6] आथि कें जाहला ?। 6 अशक्य
परी तो त्वां साच केला ।आजि एथ !।।16।।
म्हणौनि , अझुनी अर्जुना ! । झणे [7] चित्त देसी या हीना ! । 7 नको
वेगी धीर करुनियां मना ,। सावधु होई ।।17।।
सांडी हे मूर्खपण ,। उठी ; घे धनुष्यबाण ।
संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें ? ।18।।
हां गा , तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां ? ।
सांगे , झुंजावेळे सदयता । उचित कायी ? ।।19।।
हे असतीये कीर्तीसी नाशु , । आणि पारत्रिकासी [8] अपभ्रंशु [9] '' । 8 परलोक 9 नाश करणे
म्हणे जगन्निवासु । अर्जुनाते ।। 20।।

**क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते।**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।। 3।।**

**हे पार्था ! असा नामर्द होउं नको ! हे तुला शोभत नाहीं. तूं शत्रूस ताप देणारा अंतःकरणाचे हे क्षुद्र दुबळेपण सोडून देऊन युद्धास उभा रहा !**

म्हणौनि , शोकु न करी । तूं पुरता धीरु धरी ,।
हें शोच्यता [10] अव्हेरीं । पंडुकुमरा ! ।।21।। 10 खेद
तुज नव्हे हे उचित ,। येणे नासेल जोडले बहुत ।
तु अझुनी वरी हित । विचारी पां ।।22।।
येणे संग्रामाचेनि अवसरे ,। एथ कृपाळूपण नुपकरे ।
हे आतांचि काय सोयरे । जाहले तुज ? ।।23 ।।

तूं आधीचिं काय नेणसी ? । की हे गोत्रज नोळखसी ? ।
वायांचि काय करिसी । अतिशो [1] आतां ? ।।24।। 1 फाजील कळवळा
आजिचें हें झुंज । काय जन्मा नवल [2] तुज ? । 2 आयुष्यात प्रथमच नवलाची
हे , परस्परे तुम्हा व्याज [3] । सदांचि आथी ।।25।। गोष्ट आहे 3 घडणारा प्रकार
तरी , आतां काय जाहले ? । कायि स्नेह उपनले [4]। 4 उपजले
हें नेणिजे , परी कुडे [5] केले । अर्जुना तुवा ! ।।26 ।। 5 वाईट
मोहो धरिलीया , ऐसें होईल , । जे असती प्रतिष्ठा जाईल , ।
आणि परलोकही अंतरेल । ऐहिकेसी ।।27 ।।
ह्रदयाचें ढिलेपण ,। एथ निकयासी [6] नव्हे कारण । 6 हिताला
हें , संग्रामीं पतन जाण । क्षत्रियांसी ।। 28 ।।
ऐसेनि तो कृपावंतु , । नानापरी असे शिकवितु ।
हे ऐकोनि , पंडुसुतु । काय बोले ? ।। 29 ।।

**अर्जुन उवाच**

**कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।**
**इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ।। 4।।**

**अर्जुन म्हणाला- हे मधुसूदना ! परमपूज्य असे जे भीष्म व द्रोण यांच्याशी हे शत्रुनाशना ! युद्धात मी उलटा कसा लढुं ?**

देवा ! हें येतुलेवरी । बोलावे नलगे ; अवधारीं , ।
आधीं तूंचि विचारीं , । संग्रामु हा ।।30 ।।
हें झुंज नव्हे ; प्रमादु ! । एथ प्रवर्तलिया [1] दिसतसे बाधु । 7 उद्युक्त झाले असता
हा उघड लिंगभेदु [8] । वोढवला आम्हां ।।31 ।। 8 पूज्यांचा उच्छेद
देखे , मातापितरें अर्चिजती । सर्वस्वें तोषु पावविजती ।
तिये पाठी केवी वधिजती ।आपुलिया हाती ? ।।32।।
देवा ! संतवृंद नमस्कारिजे ,। का घडे , तरी पूजिजे , ।
हें वांचूनि ; केवीं निंदिजे , । स्वये वाचा ? ।।33 ।।
तैसे , गोत्रगुरु आमुचे । हें पूजनीय आम्हां नियमाचे [9] । 9 नेहमीचे
मज बहुत भीष्मद्रोणांचे। वर्ततसे [10] 34 ।। 10 भीष्म द्रोणांचे ऋण वाटते
जयांलागीं , मनें विरुं [11] ,। आम्ही स्वप्नींही न शको धरुं , । 11 वाकडेपणा
तया , प्रत्यक्ष केवी करुं । घातु , देवा ? ।।35।।
वरी जळो हें जियाले , । एथ आघवेयांसि हेचि काय जाहले ? ।
जे , यांच्या वधी , अभ्यासिले । मिरविजे आम्ही ? ।।36।।

मी ' पार्थु ' द्रोणाचा केला , । येणे धनुर्वेदु मज दिधला , ।
तेणे उपकारें काय आभारैला ,। वधी तयातें ? ।।37।।
जेथींचिया कृपा , लाहिजे वरु , । तेथेचि मने व्यभिचारु ,।
तरी काय मी भस्मासुरु ? '। अर्जुन म्हणे ।।38।।

**गुरूनहत्वा हि महानुभावान्श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।**
**हत्वार्थकामांस्त गुरूनिहैव भुञ्जीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ।।5।।**
**महात्म्या गुरूस न मारिता या लोकी भिक्षा मागुन पोट भरणेहि श्रेयस्कर होय ; पण अर्थाला ओशाळलेले असले , तरी जे गुरू , त्यास मारून या जगांतच मला त्यांचे रक्ताने माखलेले भोग भोगावे लागणार**

देवा ! समुद्र गंभीर आइकिजे । वरि , तोहि आहाच [1] देखिजे । 1 वरवरचा
परी क्षोभु मनीं नेणिजे । द्रोणाचिये ।।39।।
हे अपार जें गगन ,। वरी तयाही होईल मान [2] ,। 2मर्यादा पडेल
परी अगाध , भले , गहन । ह्रदय याचे ।।40।।
वरी अमृतही विटे ,। कीं काळवशे वज्रही फुटे , ।
परी , मनोधर्मु न लोटे [3] , । विकरविलाही [4] ! ।।41।। 3 मनाचा संकल्प न बदलणे
स्नेहालागीं माये । म्हणिपे ; तें कीरु [5] होये । 4 विकार उत्पन्न करण्याचा
परी कृपा ते मूर्त , आहे । द्रोणी इये ।।42।। प्रयत्न केला तरी 5 खरेच
हा कारुण्याची आदि । सकल गुणांचा निधि ।
विद्यासिंधु निरवधी [6] ' । अर्जुन म्हणे ।।43।। 6 अमर्याद
' हा येणे माने महंतु , । वरी आम्हालागी कृपावंतु , ।
आता , सांग पां ! येथ घातु । चिंतु येईल ? ।।44।।
ऐसे हे रणी वधावे , । मग आपण राज्यसुख भोगावे , ।
तें , मना न ये आघवें , । जीवितेसीं ।।45।।
हें येणे माने दुर्धर , । जे याहीहुनी भोग सधर [7] । 7 श्रेष्ट
ते असतु , येथवर । भिक्षा मागता भली ! ।।46।।
ना तरी , देशत्यागे जाइजे । कां गिरिकंदर सेविजे ।
परी , शस्त्र आतां न धरिजे । इयांवरी ।।47।।
देवा ! नवनिशती [8] शरी , । वावरोनी [9] यांच्या जिव्हारीं , । 8.नवीन धार लावलेले
भोग गिवसावे रुधिरी । बुडाले जे ।।48।। 9 प्रहार करून
ते , काढून काय किजती ? । लिप्त केवी सेविजती ? ।
मज नये हे उपपत्ती [10] । याचिलागी ! '' ।।49।। 10 मान्य नाही

ऐसे अर्जुन तिये अवसरी । म्हणे , " श्रीकृष्णा ! अवधारी " ।
परी , तें मना नयेचि मुरारी । आइकोनियां ।।50।।
हे जाणोनि , पार्थु बिहाला ! । मग पुनरपि बोलों लागला ।
म्हणे, " देवो कां चित्त या बोला । देतीचिना ? ।।51।।

**न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।**
**यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ।।6।।**
**आम्ही जय मिळवावा किंवा आम्हास त्यांनी जिंकावे , या दोहोपैकी आम्हास श्रेयस्कर कोणते हेहि कळत नाहीं. ज्यांना मारून जिवंत रहाण्याची इच्छा नाहीं तेच हे कौरव युद्धास समोर उभे आहेत.**

येऱ्हवी , माझ्या चित्ती जे होते , । ते , मी विचारूनि बोलिलो एथे ।
परी निके [1] काय यापरौते , । ते तुम्ही जाणा ! ।।52।।
पै , वीरु जयांसी ऐकिजे [2] । आणि या बोलीचि , प्राणु सांडिजे ।
ते , एथ संग्रामव्याजे । उभे आहाती ।।53।।
आतां , ऐसियांते वधावे , । कीं , अव्हेरुनिया निघावे , ।
या दोहीमाजी बरवे , । तें नेणो आम्ही ।।54।।

1 चांगले
2 ज्यांच्याशी आमचे वैर आहे हे ऐकुनच

**कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।**
**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।।7।।**
**दैन्याने माझी स्वाभाविक वृत्ति नष्ट होऊन माझ्या धर्माचा म्हणजे कर्तव्याचा मनाला मोह पडल्यामुळे मी तुम्हाला विचारीत आहे. जे निश्चयेकरुन श्रेयस्कर असेल ते मला सांगा. मी तुमचा शिष्य आहे. तुम्हाला शरण आलेल्या मला बोध करा.**

आम्हा काय उचित ? । ते पाहतां , न स्फुरे एथ ।
जें मोहें येणे , चित्त । व्याकुळ माझें ।।55।।
तिमिरावरुध्द जैसें । दृष्टीचें तेज भ्रंशे , ।
मग पासींच [3] असता , न दिसे । वस्तुजात ।।56।।
देवा ! तैसें मज जाहले , । जे मन , हे भ्रांती ग्रासिले ।
आतां , काय हित आपुले । तेही नेणे ! ।।57।।
तरी श्रीकृष्णा तुवां जाणावे , । निके [4] , ते आम्हा सांगावे , ।
जे , सखा , सर्वस्व आघवे , । आम्हासि तूं ।।58।।
तूं , गुरु , बंधु , पिता , । तूं आमुची इष्ट देवता ।
तूंचि सदा रक्षिता । आपदी [5] आमुतें ।।59।।

3.जवळचे
4 चांगले
5 संकटात

जैसा शिष्यांते , गुरु । सर्वथा नेणे अव्हेरु , ।
कीं , सरितांते सागरु । त्यजी केवी ? ।।60।।
नातरी , अपत्यांतें , माये । सांडूनि जरी जाये ,।
तरी , तें कैसेनि जिये ? । ऐके कृष्णा !।।61।।
तैसा सर्वापरी , आम्हासी । देवा ! तूंची एक आहासी , ।
आणि बोलिलें जरी न मानिसी । मागील माझे ,।।62।।
तरी उचित काय आम्हा , । जे व्यभिचरेना धर्मा , ।
ते झडकरी , पुरुषोत्तमा ! । सांगे आतां ।।63।।

**न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम् ।**
**अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाऽऽधिपत्यम् ।।8।।**
**कारण पृथ्वीवर निष्कंटक समृद्ध राज्य किंवा देवांचेहि स्वर्गाचे स्वामित्व मिळाले तरी इंद्रियांना शोषून टाकणारा हा माझा शोक जे दूर करील असें काहींच साधन मला दिसत नाहीं.**

हे सकळ कुळ देखोनि ,। जो शोकु उपनलासे [1] मनी ,। — 1 उपजला
तो तुझिया वाक्यावांचुनी । न जाय ; आणिकें ।।64।।
एथ पृथ्वीतळ आपु [2] होईल ,। हे महेंद्रपदही पाविजेल । — 2 स्वाधीन
परी , मोह हा न फिटेल । मानसींचा ।।65।।
जैसीं , बीजे सर्वथा आहाळली [3] । तीं सुक्षेत्रीं जऱ्ही पेरिली , । — 3 भाजलेली
तरी न विरुढती [4] ; सिंचिली। आवडे तैसी [5] ।।66।। — 4 अंकुर फुटणे 5 हवे तेवढे
ना तरी , आयुष्य पुरले [6] आहे , । तरी औषधे काही नोहे , । — 6. संपले
एथ एकचि उपेगा जाये । परमामृत ।।67।।
तैसे , राज्यभोगसमृद्धि , । उज्जीवन [7] नोहे जीव , बुद्धि , । — 7 नवचैतन्य
एथ जिव्हाळा [8] कृपानिधी !। कारुण्य तुझें '' ।।68।। — 8 जीवंत होण्याला
ऐसे अर्जुन तेथ बोलिला । जंव , क्षण एक भ्रांति [9] सांडिला । — 9 मोह
मग पुनरपि व्यापिला । उर्मी [9] तेणें ।।69।। — 10 लाटेने
की , मज , पाहतां उर्मी नोहे ! । हे अनारिसे गमत [11] आहे । — 11 भलतेच वाटते आहे
तो ग्रासिला [12] महामोहे । काळसर्पे ।।70।। — 12 नाश केला 13 मर्मयुक्त
**सवर्म [13] हृदयकल्हारीं [14] ।तेथ कारुण्यवेळेच्या [15] भरी ।** — 14 हृदयरूपी श्र्वेत कमळ
**लागला ; म्हणोनि लहरी[16] । भांजेचिना[17] ।।+71।।** — 15 भर संध्याकाळी 16सर्प
हे जाणोनि ऐसी प्रौढी [18] , । जो दृष्टिसवेंचि विष फेडी , । — दंशाचा वेग 17 नाहीसा होणे
तो धांवया [19] श्रीहरी गारुडी । पातला की ! ।।72।। — 18 महत्व 19 हाकेला
तैसिया , पंडुकुमरा व्याकुळा । मिरवतसे [20] श्रीकृष्ण जवळा । — 20 शोभत असे
तो कृपावशे , अवलीळा , । रक्षील आतां ।।73।।

म्हणोनि , तो पार्थु ।" मोहफणिग्रस्तु " ।
म्यां म्हणितला , हा हेतु । जाणोनिया ।।74।।
मग , देखा , तेथ फाल्गुनु । घेतला असे भ्रांती कवळूनु , ।
जैसा , घनपटळी भानु । आच्छादिजे ।।75।।
तयापरी , तो धनुर्धरु । जाहलासे दुःखें जर्जरु , ।
जैसा , ग्रीष्मकाळी गिरिवरु । वणवला [1] कां ।।76।। 1 वणव्याने व्याप्त झाला
म्हणोनि , सहजें [2] , सुनीळु [3] , । कृपामृते सजळु [4] । 2 नित्य 3 सुंदर सावळा 4कृपारुपी
तो वोळलासे [5] श्रीगोपाळु । महामेघु ।।77।। अमृताने युक्त 5 वळला
तेथ सुदशनांची द्युति [6] , । तेचि विद्युल्लता झळकती । 6 तेज
गंभीर वाचा , ते आयती [7] । गर्जनेची ।। 78।। 7 विस्तार
आता तो उदार [8] कैसा वर्षेल ,। तेणे अर्जुनाचळु [9] निवेल , । 8 कनवाळु 9 अर्जुनरुपी
मग नवी विरूढी [10] फुटेल । उन्मेषाची [11] ।।79।। पर्वत 10 कोंब 11 ज्ञान
ते कथा आइका , । मनाचिया आराणुका ' [12] । 12 समाधानाकरिता
ज्ञानदेवो म्हणे , " देखा " । निवृत्तिदासु ।। 80।।

**संजय उवाच**
**एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।**
**न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तृष्णीं बभूव ह ।। 9।।**
**या प्रमाणे शत्रुला ताप देणारा जो गुडाकेश म्हणजे अर्जुन त्याने हृषीकेशाला म्हणजे श्रीकृष्णाला सांगितल्यावर ' मी लढणार नाही ' असे गोविंदाला सांगून तो स्तब्ध राहीला**

ऐसें संजयो असे सांगतु । म्हणे, ' राया! तो पार्थु ।
पुनरपि शोकाकुळितु ,। काय बोले ? ।।81।।
आइके ,सखेदु बोले श्रीकृष्णाते ।" आता नाळवावें [13] तुम्ही माते। 13 विनवू नका
मी सर्वथा न झुंजे एथें । भरवसेनी [14] " ।।82।। 14 निश्चयाने
ऐसें येकि हेळा [15] बोलिला , । मग मौन धरूनि ठेला [16] । 15 वेळा 16 स्तब्ध राहीला
तेथ , श्रीकृष्णा विस्मो [17] पातला । देखोनि तयाते ।। 83।। 17 विस्मय

**तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ।।10।।**
**नंतर हे भारता म्हणजे धृतराष्ट्रा ! दोन्ही सैन्यांचे मध्यें खिन्न होऊन बसलेल्या अर्जुनास श्रीकृष्ण जरा हसल्यासारखे करून असे म्हणाले.**

मग ,आपुला चित्तीं म्हणे ,। " एथ हे कायी आदरिलें [1] येणे ?। 1 आरंभ केला
अर्जुन सर्वथा कांही नेणे ! । काय कीजें ? ।।84।।

हा उमजे आतां कवणेपरी ? । कैसेनि धीरु स्वीकारी ? " ।
जैसा ग्रहाते पंचाक्षरी [2] । अनुमानी कां ।।85।। 2 मांत्रिक
ना तरी , असाध्य देखोनि व्याधि , । अमृतासम दिव्य औषधि ।
वैद्य सूचि [3] , निरवधि ,। निदानीची [4] ।।86।। 3 योजना करतो 4 निर्वाणीची
तैसे , विवरीतु [5] असे श्रीअनंतु ,। तया दोन्ही सैन्याआंतु ,। 5 विचार करणे
जयापरी पार्थु । भ्रांती सांडी ।। 87।।
तें कारण मनीं धरिले ,। मग सरोष बोलो आदरिले ,।
जैसे , मातेच्या कोपी [6] थोकुलें [7] । स्नेह आथी [8] ।।88।। 6 राग 7 गुप्त असणे
कीं , औषधाचिया कडुवटपणी , । जैसी अमृताची पुरवणी [9] । 8 प्रेम असते 9 जोड
ते आहाच [10] न दिसे ; परी गुणी । प्रकट होय ।।89।। 10 वरवर
तैसीं , वरिवरी पाहतां उदासे [11] । आंत तरी अतिसुरसे [12] । 11 कठोर 12 रसभरीत
तिये वाक्ये , हृषीकेशे । बोलो आदरिली ।।90।।

**श्रीभगवानुवाच**

**अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।**
**गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पंडिताः ।।11।।**

**ज्यांचा शोक करुं नये त्यांचा तूं शोक करीत आहेस आणि ज्ञानाच्या बाता सांगतोस ! कोणाचे प्राण गेले काय आणि राहिले काय, ज्ञानी पुरुष त्यांचा शोक करीत नाहीत.**

मग , अर्जुनातें म्हणितलें । " आम्हीं आजि हें नवल देखिलें ,।
जें , तुवा एथ आदरिले । माझारींचि [13] ।।91।। 13 मध्येच
तूं जाणता तरी म्हणविसी , । परी नेणिवेते [14] न संडिसी [15] । 14 अज्ञान 15 टाकणे
आणि शिकवूं म्हणो , तरी बोलसी । बहुसाल [16] नीति ।।92।। 16 फार मोठ्यामोठ्या
जात्यंधा लागे पिसे [17] , । मग ते सैरा धावें जैसे , । 17 वेड
तुझे शहाणपण , तैसे । दिसतसे ।।93।।
तूं आपणपे तरी नेणसी [18] , । परी या कौरवांते शोचुं पहासी ,। 18 ओळखत नाहीस
हा बहु विस्मय आम्हासी ! । पुढपुढती ।।94 ।।
तरी , सांग पां अर्जुना ! । तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना ? ।
हे अनादि विश्वरचना । तें लटके [19] कायी ? ।।95।। 19 खोटे
एथ समर्थु एक आथी ,। तयापासूनि भूते होती , ।
तरी , हे वायांचि काय बोलती । जगामाजी ? ।।96।।
हो कां , सांप्रत ऐसे जाहले ? । जे हे जन्ममृत्यु तुवा सृजिले ? ।
आणि नाशु पावे , नाशिले । तुझेनि कायी ? ।।97।।

तूं भ्रमलेपणे अहंकृती [1] , । यासि घातु न धरिसी चित्ती , । 1 अभिमान
तरी , सांगे , कायि हे होती । चिरंतन ? ।।98।।
कीं , तूं एक वधिता [2], । आणि सकळ लोकु हा मरता [3] । 2 मारणारा 3 मरणारे
ऐसी भ्रांति , झणे [4] चित्ता । येवों देसी ।।99।। 4 नको
अनादिसिद्ध हे आघवे ,। होत , जात , स्वभावे ।
तरी तुवा कां शोचावे ? । सांगे मज ।।100।।
परी मूर्खपणें नेणसी , । न चिंतावे तें चिंतीसी , ।
आणि तूंचि नीति सांगसी । आम्हाप्रति ! ।।101।।
देखै , विवेकी जे होती । ते दोहीतेही न शोचिती ।
जे , होय , जाय , हे भ्रांती [5] । म्हणौनिया ।।102।। 5 माया

**न त्वेवाहं जातुनाऽऽसं न त्वं नेमे जनाधिपाः ।**
**न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ।।12।।**
**असे पहा कीं मी पूर्वि नव्हतो असे नाही तू व हे राजे पूर्वि नव्हते असे नाही आणि आपण सर्व यापुढे असणार नाही असेही नाही.**

अर्जुना ! सांगेन , आइक । एथ आम्ही , तुम्ही ,देख , ।
आणि , हे भुपति अशेख [6] ।आदिकरूनी [7] ।।103।। 6. संपूर्ण 7. मुळापासून
नित्यता ऐसेचि असोनी , । ना तरी , निश्चित क्षया जाउनी , ।
हे भ्रांति वेगळी करुनी , । दोन्ही नाही ।।+104।।
हे उपजे आणि नाशे , । ते मायावशे दिसे ।
एऱ्हवी , तत्वता वस्तु जे असे । तें अविनाशचि ।। 105।।
जैसे , पवने तोय हालविले , । आणि तरंगाकार जाहले , ।
तरी कवण ? के जन्मले ? । म्हणो ये तेथ ? ।।106।।
तेचि वायूचे स्फुरण ठेले [8] , । आणि उदक सहज सपाट जाहले 8 ती वाऱ्याची हालचाल होय
तरी , आतां , काय निमाले [9] ? । विचारी पां ! ।।107।। 9 नष्ट झाले

**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।**
**तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ।।13।।**
**देह धारण करणाऱ्यास या देहात ज्याप्रमाणे बालपण, तरूणपण आणि म्हातारपण प्राप्त होते त्याप्रमाणे पुढे दुसरा देह प्राप्त होतो म्हणून याबाबत ज्ञानी पुरुष मोह पावत नाही.**

आइकें , शरीर तरी एक । परी वयसा [10] भेद अनेक । 10वयाप्रमाणे
हे प्रत्यक्षचि देख । प्रमाण तूं ।।108।।

एथ कौमारत्व दिसे , । मग तारुण्यी तें भ्रंशे , ।
परी देहचि हा न नाशे , । एकेकासवें ।।109।।
तैसी , चैतन्याच्या ठायीं । इये शरीरांतरे होती , जाती , पाही ।
ऐसे जाणे , तया नाही । व्यामोहदुःख [2] ।।110।। 2 भ्रांतीमुळे होणारे दुःख

**मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।**
**आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ।।14।।**

**हे कुंतीपुत्रा ! शीतोष्ण किंवा सुख-दुःख देणारे जे हे मात्रांचे म्हणजे बाह्य सृष्टींतील पदार्थांचे इंद्रियांशी संयोग, त्यांना उद्भव व नाश आहेत. म्हणून ते अनित्य म्हणजे विनाशी होत. हे भारता! शोक न करिता ते तूं सहन कर.**

एथ नेणावया [3] हेचि कारण , । जें इंद्रिया अधीनपण । 3 न समजण्यास
तिही आकळिजें [4] अंतःकरण , । म्हणऊनि भ्रमे ।।111।। 4 व्याप्त होण
इंद्रियें विषय सेविती , । तेथ हर्ष शोक उपजती ।
ते अंतर [5] आप्लविती [6] , । संगे येणें ।।112।। 5 अंतःकरण 6 बुडवीणे
जयां विषयांच्या ठायीं , । एकनिष्ठता कहीं नाहीं , ।
तेथ दुःख आणि , कांही । सुखही दिसे ।।113।।
देखे शब्दाचि व्याप्ति [7] , । निंदा आणि स्तुति , । 7 शब्दरूपच असतात
तेथ द्वेषाद्वेष उपजती । श्रवणाद्वारे ।। 114।।
मृदु आणि कठिण , । हे स्पर्शाचे दोन्ही गुण , ।
जे वपूचेनि संगे [8], कारण । संतोषखेदा ।।115।। 8 शरीरामुळे
भ्यासुर [9] आणि सुरेख । हे रुपांचे स्वरुप देख । 9 भीतीदायक
जें उपजवी सुखदुःख । नेत्रद्वारे ।।116।।
सुगंधु आणि दुर्गंधु , । हा परिमळाचा [10] भेदु । 10वास
जो , घ्राणसंगे , विषादु , । तोषु , देता ।।117।।
तैसाचि , द्विविध रसु , । उपजवी प्रीती , त्रासु ।
म्हणौनि हा अपभ्रंशु [11] । विषयसंगु ।।118।। 11 भ्रम उत्पन्न करणारा
देखें , इंद्रिया आधीन होईजे । तै , शीतोष्णांते पाविजे ।
आणि सुखदुःखी आकळिजे । आपणपे ।।119।।
या विषयांवांचूनि कांही , । आणीक सर्वथा रम्य नाही ।
ऐसा , स्वभावोचि पाही । इंद्रियांचा ।।120।।
हे विषय तरी कैसे ? । रोहिणीचे जळ जैसे ।
कां , स्वप्नीचा आभासे । भद्रजाति [12] ।।121।। 12 हत्ती
देखे अनित्य तियापरी ! । म्हणौनि तूं अव्हेरी ।
हा सर्वथा संगु न धरी । धनुर्धरा ।।122।।

**यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ ।।**
**समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ।।15।।**

**कारण हे नरश्रेष्ठा! सुख व दुःख समान मानणारा असल्यामुळे ज्या ज्ञानी पुरुषाला यांची व्यथा लागत नाही तोच अमृतत्व म्हणजे अमृत ब्रह्माची स्थिति प्राप्त करुन घेण्यास समर्थ होतो.**

हे विषय जयाते नाकळिती [1] , । तया सुखदुःखे दोनी न पवती । 1 ग्रासत नाहीत
आणि गर्भवासुसंगती । नाही तया ।।123।।
तो नित्यरुप पार्था ।वोळखावा सर्वथा ।
जो या इंद्रियार्था । नागवेचि [2] ।।124।। 2 सापडत नाही

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सत ः ।**
**उभयोरपि दृष्टो ऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शि भि ः ।।16।।**

**जे नाही ,ते आहेसे होत नाही व जे आहे ,ते नाहीसे होत नाही, असा आहे व नाही या दोहोंचा तत्वज्ञानी पुरुषांनी शेवट पाहुन त्याच्या स्वरुपाचा निर्णय केला आहे**

आतां अर्जुना! काहीं एक । सांगेन मी ; आईक ।
जे विचारपर लोक ।वोळखिती ।।125।।
या उपाधिमाजीं [3] गुप्त ।चैतन्य असे ; सर्वगत [4] । 3 देहादि प्रपंचामध्ये
तें, तत्त्वज्ञ संत ,।स्वीकारिती ।।126।। 4 सर्वव्यापी
सलिलीं [5] पय [6] जैसे , । एक होऊनि मीनले असे , । 5 पाणी 6 दूध
परी निवडूनि राजहंसें , । वेगळे कीजें ।।127।।
की , अग्निमुखे किडाळ [7] । तोडोनियां ; चोखाळ [8]। 7 हिणकस धातु 8निर्मळ
निवडती , केवळ । बुध्दिमंत ।।128।। 9 ज्ञानाच्या 10 चातुर्याने
ना तरी , जाणिवेच्या [9] आयणी [10] , । करिता दधिकडसणी [11] , । 11 दही घुसळून
मग नवनीत , निर्वाणी [12] । दिसे जैसे ।।129।। 12 शेवटी
कीं , भूस बीज एकवट , । उपणितां [13], राहे घनवट [14] । 13 वाऱ्यावर उडवले
तेथ , उडे , तें फलकट । जाणो आलें ।।130।। असता 14 जड
तैसे ,विचारितां निरसले [15] । ते प्रपंचु ; सहजे सांडवलें । 15 असत्य ठरवीणे
मग ,तत्त्वता , तत्त्व उरलें ।ज्ञानियांसि ।।131।।
म्हणौनि अनित्याच्या ठायी । तयां आस्तिक्यबुध्दि [1] नाही । 16 नित्य आहे असा निश्चय
निष्कर्षु [17] दोहीही , । देखिला असे ।। 132।। 17 शेवट

**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।**
**विनाशमव्यस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ।।17।।**

**हे सर्व जग ज्याने विस्तारिले आहे ते मूळ आत्मस्वरुप ब्रह्म अविनाशी आहे हे लक्षात ठेव. या अव्यय तत्त्वाचा नाश करण्यास कोणिही समर्थ नाही.**

देखे , सारासार विचारितां ,। भ्रांति [1] ते पाहीं असारता [2] ।        1 मिथ्या 2 तत्वहीन
तरी ,सार ते स्वभावता । नित्य जाणें ।।133।।
हा लोकात्रयाकारु [3] । तो जयाचा विस्तारु , ।        3तीन्हि भुवनांचा आकार
तेथ नाम , वर्ण , आकारु , । चिन्ह नाही ।।134।।
जो सर्वदा सर्वगतु [4] । जन्मक्षयातीतु ।        4 सर्वव्यापी
तया , केलियाहि घातु [5] , ।कदा नोहे ।।135।।        5 नाश

**अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ।।18।।**

**नित्य ,अविनाशी व अचिंत्य असा जो शरीराचा मालक आत्मा , त्याला प्राप्त होणारे हे देह किंवा शरीरे नाशवंत म्हणजे अनित्य होत असे म्हंटले आहे. म्हणून हे भारता ! तूं युध्द कर.**

आणि शरीरजात आघवे , । हे नाशिवंत स्वभावें , ।
म्हणौनि , तुवां झुंजावें । पंडुकुमरा ।।136।

**य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ।।19।।**

**आत्मा हाच मारणारा आहे असे जो मानतो किंवा तो मारिला जातो असे समजतो त्या दोघांनाही खरे ज्ञान नाही. हा मारीत नाही व मारला जात पण नाही.**

तूं धरूनि देहाभिमानातें , ।दिठी [6] सूनि [7] शरीरातें ,।        6 दृष्टी 7 घालून
'' मी मारिता हे मरतें '' । म्हणतु आहासी ।। 137 ।।
तरी अर्जुना ! तूं हें नेणसी [8] , ।जरी तत्त्वता विचारिसी , ।        8 जाणत नाहीस
तरी , वधिता तूं नव्हेसी , । हे वध्य नव्हती ।।138।।

**न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वाऽभविता वा न भूयः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ।।20।।**
**वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।**
**कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ।।21।।**

**हा आत्मा कधी जन्मतही नाही व मरत ही नाही हा एकदा होऊन पुनः होणार नाही असे नाही.हा अज, शाश्वत नित्य, पुरातन आहे आणि शरीराचा वध झाला तरी हा मारला जात नाही .हे पार्था! हा आत्मा अविनाशी , नित्य, अज आणि अव्यय आहे हे ज्याने ओळखले तो पुरुष कोणास कसा मारविणार व कोणास मारणार तरी कसा ?**

जैसे स्वप्नामाजीं देखिजे ,। ते स्वप्नीचि साच आपजे [1] ।     1 वाटणे
मग चेऊनियां [2] पाहिजे ,। तंव कांही नाहीं ।।139।।     2 जागे झाल्यावर
तैसी , हे जाण माया ;। तूं भ्रमतु आहासी वायां , ।
शस्त्रे हाणितलिया छाया ,।जैसी आंगी न रूपे ।।140।।
कां , पूर्ण कुंभ उलंडला , । तेथ बिंबाकारु दिसे भ्रंशला , ।
परी , भानु नाहीं नासला [3] ।तयासवे ।।141।।     3 नाहीसा होणे
ना तरी , मठीं [4] आकाश जैसे । मठाकृती [5] अवतरलें असे ।     4.ऋषीची झोपडी 5ऋषीच्या
तो भंगलीया , आपैसे ।स्वरूपचि ।।142।।     झोपडीच्या आकाराचा
तैसे शरीराच्या लोपी , । सर्वथा नाशु नाही स्वरूपी [6] ।     6 आत्मा
म्हणौनि , तूं हे नारोपी । भ्रांति बापा !।143।।

**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणी ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ।।22।।**

**ज्याप्रमाणे एखादा मनुष्य जुनी वस्त्रे टाकून दुसरी नवीन ग्रहण करतो त्याप्रमाणे देही म्हणजे शरीराचा मालक म्हणजे आत्मा जुनी शरीरे टाकून दुसऱ्या नव्या शरीराशी संगम पावतो.**

जैसे जीर्ण वस्त्र सांडिजें , ।मग नूतन वेढिजें , ।
तैसे , देहांतराते स्वीकारिजें ।चैतन्यनाथे [7]।144।।     7 आत्मा

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।23।।**
**अच्छेद्योऽयमदा ह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।**
**नित्यः सर्वगताः स्थाणुरचलोऽयं सनातनः ।।24।।**

**याला म्हणजे आत्म्याला शस्त्रे तोडीत नाहीत , याला अग्नि जाळत नाही, तसेच याला पाणी भिजवत नाही , व वायु सुकवीतहि नाही. कधीहि न तुटणारा , न जळणारा , न भिजणारा व न सुकणारा हा आत्मा नित्य , सर्वत्र भरलेला ,स्थिर ,अचल , व सनातन म्हणजे चिरंतन आहे.**

हा अनादि नित्यसिद्ध [8] , । निरुपाधि [9] ,विशुद्ध , ।     8 नेहमी सिध्द असणारा 9 हेतु नसलेला
म्हणौनि , शस्त्रादिकी छेदु ।न घडे यया ।।145।।
हा प्रळयोदके [10] नाप्लवे [11] , ।अग्निदाहो [12] न संभवे , ।     10 प्रलयात 11 बुडत नाही
एथ महाशोषु न प्रभवे [13]। मारुताचा [14] ।।146।।     12 अग्नीने जळत नाही
अर्जुना ! हा नित्यु ,। अचळु , हा शाश्वतु , ।     13 प्रभाव पडत नाही 14 वारा
सर्वत्र सदोदितु । परिपूर्ण हा ।।147।।

**अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।**
**तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ।।25।।**

**या आत्म्यालाच अव्यक्त म्हणजे इंद्रियांना गोचर न होणारा, अचिंत्य म्हणजे मनानेहि जाणण्यास अशक्य आणि अविकार्य म्हणजे ज्याला कोणत्याच विकाराची उपाधि नाही, असे म्हणतात. या साठी हा आत्मा अशा प्रकारचा आहे हे जाणून त्याचा शोक करणे योग्य नाही**

.

हा तर्काचिये दिठी ।गोचर [1] नोहे , किरीटी । 1दिसणे
ध्यान , याचिये भेटी । उत्कंठा वाहे [2] ।।148। 2 प्रबळ आशा बाळगते
हा सदा दुर्लभु मना , । आपु नोहे [3] , साधना । 3 प्राप्त होत नाही
निःसीमु हा , अर्जुना ! । पुरुषोत्तमु ।।149।।
हा गुणत्रयरहितु , ।अनादि , अविकृतु , ।
व्यक्तीसी अतीतु [4] , । सर्वरुप ।।150।। 4 आकारापलीकडे गेलेला
अर्जुना ,ऐसा हा जाणावा , । सकळात्मकु देखावा , ।
मग , सहजे शोकु आघवा । हरेल तुझा ।।151।।

**अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।**
**तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ।।26।।**

**अथवा हा आत्मा नित्य नसून शरीराबरोबर नेहमी जन्मतो किंवा नेहमी मरतो असे तूं मानीत असलास तरीहि हे महाबाहो ! त्याचा शोक करणे तुला उचित नाही.**

अथवा ऐसा नेणसी ,। तूं अंतवंतचि [5] मानिसी । 5 नाशवंत
तऱ्ही , शोचूं न पवसी ।पंडुकुमरा ! ।।152।।
जो , आदि , स्थिति , अंतु , । हा निरंतर असे नित्यु , ।
जैसा , प्रवाहो अनुस्यूतु [6] । गंगाजळाचा ।।153।। 6 अखंड
तें आदि नाही खंडले , ।समुद्री तरी असे मीनले [7] , । 7 मिळाले
आणि जातचि , मध्यें उरले । दिसे जैसे ।।154।।
इये तिन्ही तयापरी , ।सरसींच [8] सदा , अवधारी । 8 समान
भूतांसी ,कवणी अवसरी [9] । ठाकती ना ।।155।। 9 वेळी
म्हणौनि , हें आघवे । एथ तुज नलगे शोचावे , ।
जें ,स्थितीचि हे स्वभावें , ।अनादि ऐसी ।।156।।
ना तरी , हें अर्जुना ! । नयेचि तुझिया मना , ।
जे , देखोनि लोकु अधीना । जन्मक्षया ।।157।।
तरी , एथ काहीं ।तुज शोकासि कारण नाही , ।
हे जन्ममृत्यु पाही । अपरिहर [10] ।158।। 10 अनिवार्य

**जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च।**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।।27।।**

**जो जन्मला त्याला मृत्यु निश्चित आहे आणि जो मेला त्याला जन्म निश्चित आहे म्हणून या अपरिहार्य गोष्टीचा तुला शोक करणे उचित नाही.**

उपजे तें नाशे , ।नाशले , पुनरपि दिसें ।
हे घटिकायंत्र जैसे । परिभ्रमे गा ! ।।159।।
ना तरी , उदो अस्तु आपैसे [1] । अखंडित होत जात जैसे । 1 आपोआप
हे जन्ममरण तैसें , । अनिवार जगीं ।।160।।
महा प्रळयअवसरे , ।हे त्रैलोक्यहि संहरे , ।
म्हणौनि , हा न परिहरे [2] ।आदि , अंतु ।।161।। 2 टळत नाही
तूं जरी हें ऐसे मानिसी , । तरी खेदु कां करिसी ? ।
काय जाणतुचि नेणसी [3] । धनुर्धरा ! ।।162।। 3 समजुनउमजून
एथ आणीकही एक पार्था ! ।तुज , बहुती परी पहांता , ।
दुःख करावया , सर्वथा ।विषो [4] नाही ।।163।। 4 कारण

**अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।**
**अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ।।28।।**

**सर्व भूते आरंभी अव्यक्त,मध्यंतरी व्यक्त व मरणसमयी पुनः अव्यक्तच अशी जर सर्वांचीच स्थिती आहे तर हे भारता ! त्यांत शोक राहिला कोठे ?**

जियें ,समस्तें इये भूतें , ।जन्माआदि , अमूर्ते ।
मग पातली व्यक्तीते [5] , । जन्मलेया ।।164।। 5 स्वरूप प्राप्त होते
तियें क्षयासि जेथ जाती , । तेथ निभ्रांत आनें [6] नव्हती । 6 निःसंशय वेगळी
देखे , पूर्वस्थितीच येती । आपुलिये ।।165।।
येर मध्ये जे प्रतिभासे , ।तें निद्रिता स्वप्न जैसे ।
तैसा आकारु हा , मायवशे , । सत्स्वरूपी [7] ।।166।। 7 आत्मा
नातरी , पवने स्पर्शिले नीर ।पढियासे [8] तरंगाकार । 8 भासते
कां , परापेक्षा [9] , अलंकार। व्यक्ती [10] कनकी ।।167।। 9 दुसऱ्याचे इच्छेने
तैसे , सकळ हें मूर्त , । जाणपां ! मायाकारित ! । 10 घडते
जैसे , आकाशी बिंबत । अभ्रपटल ।।168।।
तैसे , आदीचि जे नाही , ।तयालागीं तूं रुदसी कायी ? ।
तूं , अवीट तें पाही । चैतन्य एक ।।169।।
जयाचि आर्तीचि [11] भोगित [12] , ।विषयीं त्यजिले संत । 11 उत्कंठा 12 सहन करत
जयालागी विरक्त , ।वनवासिये [13]।।170।। 13वनात वास करतात

दिठी सूनि [1] , जयाते , । ब्रम्हचर्यादि व्रतें , । 1घालून
मुनीश्वर तपाते । आचरताती ।।171।।

**आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः।**
**आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाऽप्येनं वेद न चैव कश्चित् ।।29।।**

**जणु काय आश्चर्य म्हणजे अद्भुत वस्तु म्हणून याजकडे पहातो , तसेच दुसरा कोणी आश्चर्यासारखे याचे वर्णन करतो , आणि दुसरा कोणी जणु काय आश्चर्य म्हणून ऐकतो , पण याप्रमाणे पाहून ,वर्णन करून व ऐकुनहि यापैकी कोणी याला तत्वतः जाणीत नाही.**

एक अंतरी निश्चळ ,। जे निहाळिता केवळ , ।
विसरले सकळ ।संसारजात ।।172।।
एकां गुणानुवाद [2] करितां , । उपरति [3] होऊन चित्ता , । 2 गुणगान 3 शांती
निरवधी [4] तल्लिनता । निरंतर [5]।।173।। 4 अमर्याद 5 अखंड
एक ऐकतांचि निवाले ,। ते देहभावी सांडिले ।
एक अनुभवे पातले , । तद्रुपता ।।174।।
जैसे , सरिता ओघ समस्त , ।समुद्रामाजी मिळत ,।
परी , माघौते, न समात [6]। परतले नाही ।।175।। 6 न मावणारा
तैसिया योगीश्वरांचिया मती , । मिळवणीसवे एकवटती , ।
परी जे विचारूनि , पुनरावृत्ति [7] । भजतीचिना [8]।।176।। 7 पुनःपरत येत नाही
8 आश्रय करणे

**देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।**
**तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ।।30।।**

**सर्वांच्या शरीरात असणारा शरीराचा मालक आत्मा हा सर्वदा अवध्य आहे म्हणून ,हे भारता !सर्व म्हणजे कोणत्याहि भूताबद्दल शोक करणे तुला योग्य नाही.**

जें सर्वत्र , सर्वही देही , । जया , करितांही घातु नाही , ।
तें विश्वात्मक [9] तूं पाही । चैतन्य एक ।।177।। 9 विश्वस्वरूप
जयाचेनि स्वभावे [10] , । हे होत जात आघवे , । 10 आपोआप
तरी सांग , काय शोचावें । एथ तुवां ? ।।178।।
एऱ्हवी तरी पार्था ! । तुज कां नेणो , न मने चित्ता , ।
परी किडाळ [12] हे शोचितां । बहुतीं परीं ।।179।। 12 वाईट

**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।**
**धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ।।31।।**

**शिवाय स्वधर्माकडे पाहिले तरीही या वेळी कचरणे तुला योग्य नाही. कारण,धर्मोचित युध्दापेक्षा क्षत्रियाला श्रेयस्कर असे दुसरे काही नाही.**

तूं अझुनी कां न विचारिसी ? । काय हें चिंतितु आहासी ? ।
स्वधर्मु तो विसरलासी । तरावे जेणे ! ।।180।।
या कौरवां भलते जाहलें , । अथवा तुजचि काही पातलें , ।
की युगचि हे बुडालें । जऱ्ही एथ ।।181।।
तरी ,स्वधर्मु एकु आहे , ।तो सर्वथा त्याज्य नोहे , ।
मग , तरिजेल काय ? पाहे । कृपाळूपणे ? ।।182।।
अर्जुना ! तुझे चित्त । जऱ्ही जाहलें द्रवीभूत [1] , । — 1 विरघळणे
तऱ्ही हे अनुचित , । संग्रामसमयीं ।।183।।
अगा गोक्षीर [2] जरी जाहले , ।तरी , पथ्यासि नाही म्हणितले । — 2.दूध
ऐसेनिहि , विष होय ; सूदले [3] । नवज्वरी देतां ।।184।। — 3 दिले
तैसें आनी आन [4] करितां , । नाशु होईल हिता । — 4 भलते
म्हणौनि , तूं आतां । सावध होई ।।185।।
वायांचि व्याकुळ कायी ? । आपुला निजधर्मु पाहीं , ।
जो आचरितां , बाधु नाही । कवणे काळी ।।186।।
जैसे , मार्गेचि चालतां , ।अपावो न पवे [5] सर्वथा । — 5 त्रास होत नाही
कां , दीपाधारे वर्तता , । नाडळिजें [6] ।।187।। — 6 अडखळणे
तयापरी , पार्था ! ।स्वधर्मे राहाटतां , ।
सकळ कामपूर्णता । सहजे होय ।।188।।
म्हणौनि , यालागी पाही । तुम्हां क्षत्रियां आणीक कांही ।
संग्रामावाचूंनि नाही ।उचित , जाणे ।।189।।
निष्कपटा [7] होआवें , । उसिणा [8] घाई झुंजावे । — 7 शुद्ध अंतःकरणाने
हें असो , काय सांगावे । प्रत्यक्षावरी ? ।।190।। — 8 समोरासमोर

**यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।**
**सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ।।32।।**

**आणि सहजगत्या उघडे सांपडलेले स्वर्गाचे द्वार असे जें हे युध्द ,ते जे क्षत्रिय भाग्यवान त्यांसच हे पार्था ! प्राप्त होत असते.**

अर्जुना ! झुंज देखे आतांचे , । हें , हो का जे दैव तुमचे ! ।
की , निधान सकळ धर्माचे । प्रगटले असे ।।191।।
हा संग्रामु काय म्हणिपे ! । कीं , स्वर्गुचि येणें रूपे , ।
मूर्त कां , प्रतापे । उदो [9] केला ।।192।। — 9 उदय

ना तरी , गुणाचेनि पतिकरें [1] ।आर्तीचेनि पडिभरे [2] । 1 अनुभव 2 आधिक्य
हे कीर्तीचि , स्वयंवरे । आली , तुज ।।+193।।
क्षत्रिये बहुत पुण्य कीजें , । तै , झुंज ऐसे लाहिजें ।
जैसे , मार्गे जाता , आडळिजे [3] । चिंतामणि ।।194।। 3 आढळणे
नातरी , जांभया पसरे मुख , । तेथ अवचटे पडे पीयुख [4] । 4 अमृत
तैसा , संग्रामु हा देख । पातला असें ।।195।।

**अथ चेत्त्वमिमं धर्म्यं सग्रामं न करिष्यसि ।**
**ततः स्वधर्मं कीर्तीं च हित्वा पापमवाप्स्यसि।।33।।**
**म्हणून तुझ्या धर्माला अनुकूल असे हे युध्द जर तूं करणार नाहीस , तर स्वधर्म आणि कीर्ति गमावून पापाची जोड करशील .**

आतां हा ऐसा अव्हेरिजे , । मग नाथिले शोचूं बैसिजें ।
तरी आपण आहाणा [5] होईजे । आपणपेयां ।।+196।। 5 घातक
पूर्वजांचे जोडले , ।आपणचि , होय धाडिले [6] । 6 घालवणे
जरी , आजि शस्त्र सांडिले , ।रणी इये ।। 197।।
असती कीर्ति जाईल ,। जगचि अभिशापु देईल , ।
आणि गिवसित [7] पावतील । महादोष ।।198।। 7 शोधून
**जैसीं , भातारेहीन [8] वनिता , । उपहती [9] पावे सर्वथा , ।** 8 पतीविणा 9 अनादर
**तैशी दशा , जीविता । स्वधर्मेवीण ।। 199।।**
ना तरी , रणी शव सांडिजें , । तें चौमेरी [10] गिधी विदारिजें [11] , । 10 चोहीकडुन11 गीधाडाने
तैसे , स्वधर्महीना अभिभविजें [12] । महादोषी ।।200।। फाडुन खाणे 12 घेरणे

**अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।**
**संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ।।34।।**
**इतकेच नव्हे तर सर्व लोक तुझी दुष्कीर्ति गात रहातील! आणि दुष्कीर्ति म्हटली म्हणजे संभावित पुरुषाला मरणापेक्षांहि मरण होय.**

म्हणौनि , स्वधर्मु हा सांडसील । पापा वरपडा [13] होसील । 13 प्राप्त होणे
आणि अपेश , तें न वचेल , । कल्पांतवरी ।।201।।
जाणतेनि तंवचि जियावे , । जंव अपकीर्ति आंगा न पवे ।
आणि सांग पां ! केवीं निगावे । एथोनिया ? ।।202।।
तूं निर्मत्सर ,सदयता । येथूनि निघसील कीर माघौता , ।
परी ,ते गती [14] समस्तां । न मनेल ययां ।।203।। 14 परिस्थिती

हे चहूकडूनि वेढितील । बाणवरी घेतील ।
तेथ पार्था , न सुटिजेल । कृपाळुपणे ।।204।।
ऐसेनिहि प्राणसंकटे , । जरी विपाये पां निघणे घटे [1] । 1 घडणे
तरी , तें जियालेही वोखटे , । मरणाहुनी ।।205।।

**भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः ।**
**येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ।।35।।**
**रणातून तूं भयाने परतलास असे सर्व महारथी समजतील , आणि ज्यांना तूं आज बहुमान्य झालेला आहेस तेच तुझी किंमत कमी समजु लागतील.**

तूं आणीकही एक न विचारिसी , । एथ संभ्रमे [2] झुंजो आलासी । 2 उत्सुकतेने
आणि सकणवपणे [3] निघालासी । मागुता जरी , ।।206।। 3 दयेपोटी
तरी तुझे ते , अर्जुना ! । या वैरियां दुर्जना , ।
कां प्रत्यया [4] येईल मना ? । सांगै मज ।।207।। 4 पटणे

**अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः।**
**निंदन्ततस्व सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ।।36।।**
**तसेच तुझ्या सामर्थ्याची निंदा करून तुझ्याबद्दल बोलु नयेत अशा अनेक गोष्टी तुझे शत्रु बोलतील. यापेक्षा अधिक दुःखकारक ते काय ?**

हे म्हणती ' गेला रे गेला । अर्जुन आम्हां बिहाला ' ।
हा सांगै , बोलु उरला । निका कायी ? ।।208 ।।
लोक सायासे [5] करूनि , बहुतें , । कां वेचिति आपुली जीवितें ? । 5 प्रयत्नपूर्वक
परी वाढविती कीर्तितें । धनुर्धरा ! ।।209।।
ते तुज अनायासे। अनकळित [6] जोडिली असे । 6 सहज
हे अद्वितीय जैसे । गगन आहे , ।।210।।
तैसी , कीर्ति निःसीम ।तुझ्या ठायीं निरुपम ।
तुझे गुण उत्तम । तिही लोकीं ।।211।।
दिगंतीचे भुपति , । भाट होऊनि , वाखाणिती ।
जे ऐकिलिया , दचकती । कृतांतादिक ।।212।।
ऐसी महिमा घनवट [7] , । गंगा जैसी चोखट , । 7 थोर
जया देखीं ,जगी ,सुभट [8] । वाट जाहली [9] ।।+213।। 8 उत्कृष्ट योध्यांना
तें पौरुष तुझे अद् भुत । आइकोनियां , हे समस्त । 9 मार्ग झाली आहे
जाहले आथि विरक्त [10] । जीवितेंसी ।।214।। 10 उदासीन

| | |
|---|---|
| जैसा , सिंहाचिया हांका , ।युगांतु[1]होय मदमुखा [2]। | 1 अंतकाल ओढवला असे |
| तैसा , कौरवा अशेखां , । धाकु तुझा ।।215।। | होते 2 मदोन्मत्त हत्ती |
| जैसे , पर्वत वज्राते , । ना तरी , सर्प गरुडाते , । | |
| तैसे , अर्जुना हे तूते । मानिती सदा ।।216।। | |
| तें अगाधपण [3]जाईल , । मग हीणावो अंगा येईल , । | 3 महत्व |
| जरी मागुता निघसील । न झंजतुचि ।।217।। | |
| आणि हे , पळता पळो नेदिती , । धरूनि अवकळा [4] करिती । | 4 फजिती |
| न गणित कुटी बोलती [5] । आइकतां तुज ।।218।। | 5 निंदेचे भाषण |
| मग ते वेळी हिये [6] फुटावे , । आतां लाठेपणे [7] कां न झुंजावे ? । | 6.हृदय 7 पराक्रमाने |
| हे जिंतले , तरी भोगावे ।महीतळ [8] ।।219।। | 8 पृथ्वी |

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**
**तस्मादुत्तिष्ट कौंतेय युध्दाय कृतनिश्चय ः।।37।।**

**मेलास तर स्वर्गास जाशील ,व जिंकलेस तर पृथ्वी भोगशील ! म्हणून हे अर्जुना! युध्दाचा निश्चय करून उठ.**

| | |
|---|---|
| ना तरी , रणी एथ । झुंजता , वेचले जीवित । | |
| तरी स्वर्गसुख अनकळित [9] , । पावसील ।।220।। | 9 सहज |
| म्हणौनि , ये गोठी , । विचारु न करी ; किरीटी ! । | |
| आतां धनुष्य घेउनि उठी , । झुंजै वेगी ।।221।। | |
| देखै , स्वधर्मु हा आचरतां , । दोषु नाशे असता , । | |
| तुज , भ्रांति , हे कवण , चित्ता । पातकाची ? ।। 222।। | |
| सांगै , प्लवेचि [10] काय बुडिजें ?। कां मार्गी जाता आडळिजे [11]? । | 10 नाव 11अडखळणे |
| परी , विपाये [12] , चालों नेणिजे , । तरी तेही घडे ।।223।। | 12 चुकुन |
| अमृते तरीच मरिजें , । जरी विखेसि [13] सेविजे । | 13 विषाबरोबर |
| तैसा , स्वधर्मी दोषु पाविजें , । हेतुकपणे [14] ।।224।। | 14 फळहेतुने |
| म्हणौनिया पार्था ! । हेतु सांडोनि , सर्वथा , । | |
| तुज क्षात्रवृत्ति झुंजता , । पाप नाही ।।225।। | |

**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।**
**ततो युध्दाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ।।38।।**

**सुखदुःख ,नफानुकसान आणि जयापराजय सारखे मानून नंतर लढायला लाग.असे केले म्हणजे तुला कोणतेच पाप लागणार नाही.**

सुखी संतोषा न यावें ,। दुःखीं विषादा न भजावे , ।
आणि , लाभालाभ न धरावे । मनामाजी ।। 226।।

एथ विजयपण होईल । कीं , सर्वथा देह जाईल ।
हे , आधीचि [1] काही , पुढील । चिंतावेना ।।227।। 1 अगोदर
आपणयां उचिता । स्वधर्मे राहाटतां , ।
जे पावे ; ते निवांता । साहोनि जावे ।।228।।
ऐसियां मने होआवे , । तरी दोषु न घडे स्वभावे , ।
म्हणौनि , आतां झुंजावे । निभ्रांत , तुवा ।।229।।

**एषा तेऽभिहिता सांख्ये बुध्दिर्योगे त्विमां शृणु ।**
**बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंध प्रहास्यसि ।।39।।**

**सांख्य म्हणजे संन्यासनिष्टेप्रमाणे तुला ही बुद्धि म्हणजे ज्ञान किंवा उपपत्ति सांगितली. आता ज्या बुद्धिने युक्त झालास म्हणजे कर्मे न सोडताहि हे पार्था ! तूं कर्मबंध सोडशील अशी ही कर्मयोगातील बुद्धि म्हणजे ज्ञान तुला सांगतो, ऐक.**

हे सांख्यस्थिति मुकुळित [2] । सांगितली , तुज एथ । 2 थोडक्यात
आतां , बुद्धियोगु [3] निश्चित ।अवधारी पां !।। 230।। 3 कर्मयोग
जया बुध्दियुक्ता ।जाहलिया ,पार्था ! ।
कर्मबंधु सर्वथा । बाधूं न पवे ।।231।।
जैसे वज्र कवच [4] लेइजें , । मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे , । 4 चिलखत
परी जैतेसी [5] उरिजे । अचुंबित ।।232।। 5जय मीळवून

**नेहाभिक्रमनाशोऽ स्ति प्रत्यवायो न विद्यते।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।।40।।**

**येथे म्हणजे या कर्मयोगमार्गात एकदा आरंभिलेल्या कर्माचा नाश होत नाही व पुढे विघ्नहि . येत नाही . या धर्माचे थोडेहि आचरण मोठ्या भयापासून संरक्षण करिते.**

तैसे , ऐहिक तरी न नशे , । आणि मोक्षु तो उरला असें , ।
जेथे पूर्वानुक्रमु [6] दिसे । चोखाळत [7] ।। 233।। 6 पूर्विपासून चालत आलेला
कर्माधारे राहाटिजें , । परी कर्मफळ न निरीक्षिजे [8] । 7 निर्मळ 8 दृष्टि न ठेवून
जैसा मंत्रज्ञु न बाधिजें । भूतबाधा ।। 234।। 9 आत्मसात केला असता
तियापरी , जे सुबुध्दि ! । आपुलालिया [9] निरवधि [10] । 10 पूर्णपणे 11 कर्म योग
हा [11] असतांचि , उपाधी[12] । आकळूं[13] न सके ।।235।। 12 दुःख 13 व्यापणे
जेथ न संचरे पुण्यपाप । जें सूक्ष्म अति निष्कंप ।
गुणत्रयादि लेप । न लगती जेथ ।।236।।
अर्जुना ! ते पुण्यवशे , ।जरी अल्पचि , हृदयी बुध्दि प्रकाशे , ।
तरी , अशेषही नाशे । संसारभय ।।237।।

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।**
**बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ।।41।।**

**हे कुरुनंदना ! व्यवसाय म्हणजे कार्याकार्याचा निश्चय करणारी इंद्रियरुपी बुद्धि या मार्गात एक म्हणजे एकाग्र असावी लागते. कारण ज्यांच्या बुद्धीचा अशा प्रकारे एक निश्चय होत नाही त्यांच्या बुद्धि म्हणजे वासना अनेक फाटे फुटलेल्या व अनंत प्रकारच्या असतात.**

जैसी , दीपकळिका धाकुटी , । परी बहु तेजाते प्रकटी ।
तैसी सद् बुद्धि हे थेकुटी [1] । म्हणो नये ।।238।। 1 लहान
पार्था ! बहुती परी ।हे अपेक्षिजे विचारशूरीं , ।
जे , दुर्लभ चराचरी । सद्वासना ।। 239।।
आणिकासारिखा बहुवसु , । जैसा न जोडे परिसु ।
कां , अमृताचा लेशु [2] । दैवगुणें ।।240।। 2 थेंब
तैसी , दुर्लभ जे सद् बुद्धि । जिये परमात्माचि अवधि [3] । 3 सीमा
जैसा गंगेसी उदधि [4] । निरंतर ।।241।। 4 सागर
तैसे , ईश्वरावाचुनी काहीं , । जिये आणीक लाणी [5] नाही । 5 आश्रय
ते एकचि बुध्दि , पाही । अर्जुना ! जगी ।।242।।
येर ते दुर्मति , । जे बहुधा असे विकरति [6] । 6 विकृत
तेथ निरंतर रमती । अविवेकिये ।।243।।
म्हणौनि , तयां , पार्था ! ।स्वर्ग संसार नरकावस्था (स्वर्गसंसारी आस्था ) , ।
आत्मसुख सर्वथा । दृष्ट नाही ।।244।।

**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ।**
**वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीतिवादिनः ।।42।।**
**कामात्मानःस्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।**
**क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ।।43।।**
**भोगैश्वर्यप्रसक्तानां तयाऽपहृतचेसाम् ।**
**व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ।।44।।**

**हे पार्था ! कर्मकांडात्मक वेदांतील फलश्रुतीच्या वाक्यांना भुललेले व त्याखेरीज दुसरे काही नाही असे म्हणणारे मूढ जे लोक , फुलवून असे भाषण करितात की 'अनेक प्रकारच्या यज्ञयागादि कर्मानीच पुनः जन्म होणे हे फल मिळून जन्मोजन्मी भोग व ऐश्वर्य प्राप्त होते 'ते स्वर्गाच्या पाठीस लागलेले काम्य बुद्धिचे लोक वरील भाषणाकडे त्यांचे मन ओढले जाऊन, भोग व ऐश्वर्य यात गढून जातात त्यामुळे त्यांची व्यवसायात्मक म्हणजे कार्याकार्याचा निश्चय करणारी बुद्धि कधीच समाधिस्थ म्हणजे एका ठीकाणी स्थिर होउ शकत नाही.**

वेदाधारे बोलती , ।केवळ कर्म प्रतिष्ठिती , ।
परी , कर्मफळी आसक्ती ।धरुनिया , ।।245।।
म्हणती '' संसारी जन्मिजें , । यज्ञादिक कर्म कीजें , ।
मग स्वर्गसुख भोगिजे ।मनोहर।।246।।
येथे हे वाचूनि काही । आणिक सर्वथा सुखचि नाही , '' ।
ऐसे अर्जुना बोलती , पाही ! । दुर्बुद्धि ते ।। 247 ।।
देखै , कामनाअभिभूत [1] ।होऊनि ; कर्मे आचरत , । 1 वश
ते , केवळ भोगी चित्त । देऊनियां ।। 248 । ।
क्रियाविशेषे , बहुते , । न लोपिती [2] विधीतें । 2 चुकणे
निपूण होऊन धर्मातें । अनुष्ठिती ।।249।।
परी , एकचि कुडे [3] करिती , । जे स्वर्गकामु मनी धरिती , । 3 चुकीचे
यज्ञपुरुषा चुकती । भोक्ता जो ' ।।250।।
जैसा , कर्पुराचा राशी कीजें , । मग अग्नि लाऊन दीजें ।
कां , मिष्टान्नी संचरविजे । काळकूट ।।251।।
दैवे अमृतकुंभ जोडला , । तो पाये हाणोनि उलंडिला , ।
तैसा , नासिती धर्मु , निपजला । हेतुकपणे ।।252।।
सायासे पुण्य अर्जिजें , । मग संसारु कां अपेक्षिजें ? ।
परी , नेणती , ते , काय कीजें ? । अप्राप्य देखे ।।253।।
जैसी रांधवणी रससोय निकी । करुनिया , मोले विकीं ।
तैसा ,भोगासाठी अविवेकी । धाडिती धर्मु ! ।।254।।
म्हणौनि , हे पार्था ! । दुर्बुद्धि देख , सर्वथा ।
तया वेदवादरतां । मनी वसे ।।255।।

**त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।**
**निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।।45।।**

**हे अर्जुना ! कर्मकांडात्मक वेद अशा रितीने त्रैगुण्याच्या गोष्टिनी भरलेले असल्यामुळे तूं निस्त्रैगुण्य म्हणजे त्रिगुणातीत,नित्यसत्त्वस्थ,सुखदुःखादि द्वंद्वापासून अलिप्त आणि योगक्षेमादि स्वार्थात न गढता आत्मनिष्ठ हो.**

तिन्ही गुणी आवृत , । हे वेद जाणै निभ्रांत [4] । 4 निःसंशय
म्हणौनि , उपनिषदादि समस्त , । सात्विक ते ।।256।।
येर रजतमात्मक ।जेथ निरुपिजे कर्मादिक ।
जे केवळ स्वर्गसूचक । धनुर्धरा ।।257।।

म्हणौनि तूं जाण ,। हे सुखदुःखासीच कारण ।
एथ झणे [1] अंतःकरण । रिगो [2] देसी ।।258।। 1 नको 2 जाणे
तूं गुणत्रयाते अव्हेरी , ।" मी ,माझे ", हे न करी ।
एक आत्मसुख [3] अंतरी । विसंब [4] झणी [5] ।।259।। 3 स्वतःचे सुख 4 सोडणे 5 ताबडतोब

**यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।**
**तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ।।46।।**

**चोहोकडे पाण्याचा पूरच पूर झाला की विहीरीचा जितका अर्थ किंवा प्रयोजन रहाते अर्थात काहीच रहात नाही तितकेच ज्ञान प्राप्त झालेल्या ब्राह्मणाला सर्व कर्मकांडात्मक वेदाचे प्रयोजन असते म्हणजे नुसत्या काम्य कर्मरूपी वैदिक कर्मकांडाची त्याला अपेक्षा रहात नाही.**

जरी वेदे बहुत बोलिले , । विविध भेद सूचिले , ।
तऱ्ही , आपण हित आपुले , । तेचि घेपे [6] ।।260।। 6.घेणे
जैसा , प्रगटलिया गभस्ती [7] , । अशेषही मार्ग दिसती । 7 सूर्य
तरी तेतुलेहि काय चालिजती ? । सांगै मज ।।261।।
कां , उदकमय सकळ । जऱ्ही जाहले असे महीतळ , ।
तरी , आपण घेपे केवळ । आर्तीचिजोगे [8]।।262।। 8 तहानेपुरते
तैसे , ज्ञानीये जे होती , । ते वेदार्थाते विवरिती [9] । 9 तपासतात
मग अपेक्षित तें स्वीकारिती , । शाश्वत जें ।।263।।

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ।।47।।**

**कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे; फळ मिळणे किंवा न मिळणे हे केंव्हाहि तुझ्या अधिकारातले म्हणजे ताब्यातले नाही;म्हणून माझ्या कर्माचे अमुक फळ मिळावे असा हावरेपणाचा हेतु मनात ठेवून काम करणारा होऊ नको आणि कर्मे न करण्याचाहि तूं आग्रह धरु नको.**

म्हणौनि , आइके पार्था । याचिपरी पाहता ।
तुज उचित होय आतां , । स्वकर्म हें ।।264।।
आम्ही समस्तही विचारिले , । तव ऐसेचि , हें , मना आलें ।
जे , न सांडिजे तुवां आपुले । विहित कर्म ।।265।।
परी कर्म फळे आस न करावी , । आणि , कुकर्मी संगति न व्हावी ,।
हे सत्क्रियाचि आचरावी। हेतूविण ।।266।।

**योगस्थः कुरु कर्माणि सङगं त्यक्त्वा धनंजय ।**
**सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यतें ।।48।।**

**हे धनंजया ! आसक्ति सोडून, व कर्म सिद्ध होवो किंवा निष्फळ होवो दोन्ही सारखीच मानून, 'योगस्थ ' होत्साता कर्मे कर.**

तूं योगयुक्त होऊनी , ।फळाचा संगु टाकुनी , ।
मग , अर्जुना ! चित्त देउनी । करी कर्मे ।।267।।
परी , आदरिले [1] कर्म , दैवे , । जरी समाप्तीते पावे , । — 1 आरंभ केलेले
तरी , विशेषे तेथ तोषावे , । हेही नको ।।268 ।।
की ,निमित्ते कोणे एके , । ते सिद्धी न वचता ठाके , ।
तरी तेथिचेनि अपरितोखे [2] । क्षोभावे [3] ना ।।269 ।। — 2.असंतोष 3 मनाची गडबड
आचरतां सिद्धी गेलें , । तरी काजाची कीर [4] आले । — 4 खरोखर
परी ठेलियाही ,'' सगुण [5] जहाले '' । ऐसेचि मानी ।।270।। — 5 चांगले
देखै , जेतुलाले कर्म निपजे , । तेतुले आदिपुरुषी अर्पिजें , ।
तरी , परिपूर्ण सहजे । जहाले, जाणै ।।271।।
देखै ,संतासंतकर्मी [6] , । हे जें , सरिसेपण मनोधर्मी , । — 6 बरेवाइट कर्म
तेचि योगस्थिति , उत्तमी । प्रशंसिजें ।।272।।

**दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।**
**बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ।।49।।**
**बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।**
**तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।50।।**

**कारण बुद्धीच्या सारखेपणाच्या योगापेक्षा हे धनंजया ! बाह्य कर्म फारच कनिष्ट होय म्हणून या साम्य बुद्धीला शरण जा. फलहेतुक म्हणजे फलाकडे नजर देऊन कार्म करणारे लोक कृपण म्हणजे दीन किंवा खालच्या पायरीचे होत. साम्य बुद्धीने जो युक्त झाला तो पाप आणि पुण्य या दोहोपासून या लोकी अलिप्त रहातो, म्हणून योगाचा आश्रय कर. पापपुण्य न लागता कर्मे करण्याची जी चतुराई, कौशल किंवा युक्ति तिलाच कर्मयोग असे म्हणतात.**

अर्जुना ! समत्व चित्ताचे , । तेचि सार जाणै योगाचे , ।
जेथ , मन आणि बुद्धीचे । ऐक्य आथी ।। 273।।
तो बुद्धियोग विवरितां।बहुते पाडे [7] , पार्था ! । — 7 प्रकार
दिसे हा अरुता [8] , । कर्मयोगु ।।274।। — 8 कमी प्रतीचा
परी तेचि कर्म आचरिजे , । तरीच हा योगु पाविजे , ।
जे , कर्मशेष सहजे ।योगस्थिति ।।275।।
म्हणौनि बुद्धियोगु सधरु [9] । तेथ अर्जुना ! होई स्थिरु । — 9 गंभीर
मने करी अव्हेरु , । फलहेतूचा ।।276।।

जे बुध्दियोगा योजिले , । तेचि पारंगत जाहले , ।
इही , उभयबंधी सांडिले । पापपुण्यी ।।277।।

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः।**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ।।51।।**

**समत्व बुद्धिने ज्ञानी पुरुष युक्त झाले म्हणजे कर्मफलाचा त्याग केल्याने ते जन्माच्या बंधापासून मुक्त होत्साते परमेश्वराच्या दुःखविरहित पदाला जाऊन पोचतात.**

ते कर्मी तरी वर्तती , । परी कर्मफळा नातळती [1] । 1 अलिप्त
आणि यातायाति [2] न लोपती [3] । अर्जुना तया ।। 278।। 2 जन्ममरण 3.बंद पडतात
मग , निरामयभरित [4] । पावती पद अच्युत । 4 आनंदयुक्त
ते बुद्धियोगयुक्त । धनुर्धरा ! ।।279।।

**यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।**
**तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ।।52।।**

**जेंव्हा तुझी बुद्धि मोहाच्या गढूळ आवरणांतून पार पडेल तेंव्हा जे ऐकले असेल ते, आणि जे काय ऐकावयाचे असेल ते, या दोहोचाही तुला कंटाळा येईल.**

तूं ऐसा तै होसी , । जै , मोहाते यया सांडिसी ।
आणि वैराग्य मानसी ।संचरैल ।।280।।
मग , निष्कळंक , गहन , । उपजेल आत्मज्ञान , ।
तेणे निचाडे [5] होईल मन । अपैसे तुझें ।।281।। 5 विरक्त
तेथ आणिक काही जाणावे ,। का , मागिलाते स्मरावे ।
हे , अर्जुना ! आघवे । पारुषेल [6] ।।+282।। 6 थांबेल

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ।।53।।**

**नाना प्रकारच्या वेदवाक्यांनी गांगरून गेलेली तुझी बुद्धि जेव्हा समाधीवृत्तित स्थिर होईल, तेव्हा हा साम्य-बुद्धिरुप योग तुला प्राप्त होईल.**

इंद्रियांचिया संगति । जिये पसरु [7] होतसे मति , । 7 विस्तार
ते , स्थिर होईल मागुती ।आत्मस्वरूपी ।। 283 ।।
समाधिसुखी केवळ , ।जै बुध्दि होईल निश्चळ , ।
तै , पावसी तूं सकळ ।योगस्थिति ।।284।।

**अर्जुन उवाच**

**स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।**
**स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ।।54।।**

**अर्जुन म्हणाला हे केशवा ! समाधिस्थ स्थितप्रज्ञ कोणाला म्हणावे ? त्या स्थितप्रज्ञाचे बोलणे,बसणे व चालणे कसे असते ते मला सांगा.**

तेथ अर्जुन म्हणे , ' देवा ! । हाचि अभिप्रावो आघवा ।
मी पुसेन ; आतां सांगावा । कृपानिधी ' ।।285।।
मग अच्युत म्हणे , '' सुखे । जे किरीटी , तुज निके [1] । — 1 आवडते
ते पूस पां उन्मेखे [2] । मनाचेनि ''।।286।। — 2 उघडपणे
या बोला पार्थे ।म्हणितले , '' सांग '' पां श्रीकृष्णातें ।
'' काय म्हणिपे स्थितप्रज्ञातें ?। वोळखो केवी ? ।।287।।
आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजें , । तो कैसिया चिन्ही जाणिजे , ।
जो समाधिसुख भुंजें [3] । अखंडित ।।288।। — 3 उपभोगतो
तो कवणे सिथती असें ?। कैसेनि रुपी विलसे [4] ? । — 4 वागतो
देवा ! सांगावे हे ऐसें । लक्ष्मीपती ! '' ।। 289।।
तंव , परब्रह्म अवतरणु [5] । जो षड् गुणाधिकरणु [6] । — 5 मूर्तीमंत 6 सहा गुणांचे
तो , काय तेथ , नारायणु । बोलतु असे ।।290।। — वसतीस्थान

**श्रीभगवानुवाच**

**प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।**
**आत्मन्येवाऽऽत्मना तुष्ट ः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।।55।।**

**भगवान म्हणतात हे पार्था ! मनातील सर्व काम म्हणजे वासना जेव्हा सोडतो व आपण आपल्या ठायीच संतुष्ट होऊन रहातो, तेंव्हा त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात.**

म्हणे , ' अर्जुना परियेसी । जो हा अभिलाषु [7] प्रौढ [8] मानसी [9] । — 7 हांव 8 समर्थ 9 मनात
तो अंतराय [10] स्वसुखेसी । करीतु असे ।।291।। — 10 अडथळा
जो सर्वदा नित्यतृप्तु , । अंतःकरण भरितु , ।
परी , विषयामाजी पतितु । जेणे संगे कीजें , ।।292।।
तो कामु सर्वथा जाये ,। जयाचे आत्मतोषी मन राहे , ।
तोचि स्थितप्रज्ञु होये । पुरुष जाणै ।।293।।

**दु :खेष्वनुद्विग्नमना : सुखेषु विगतस्पृह : ।**
**वीतरगभयक्रोध : स्थितधीर्मुनिरुच्यते ।।56।।**
**दुःखात ज्याच्या मनाला खेद होत नाही, सुखाचे ठायी ज्याची आसक्ति नाही,आणि प्रीति,भय व क्रोध ही ज्याची सुटली, त्याला सिथतप्रज्ञ मुनि म्हणतात.**

नाना दु :खी प्राप्ती। जयासी उद्वेगु नाही चित्ती ।
आणि सुखाचिया आर्ती [1] । अडपैजेना [2] ।। 294।। — 1 तळमळीने 2 अडचणीत पडणे
अर्जुना ! तयाच्या ठायी । कामक्रोधु सहजे नाही ।
आणि भयाते नेणे कही , । परिपूर्णु तो ।। 295।।
ऐसा जो निरवधि [3] , । तो जाण पां ! स्थिरबुद्धि। । — 3 अमर्याद
जो निरसूनि उपाधि । भेदरहितु ।।296 ।।

**यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।**
**नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।57।।**
**सर्व गोष्टीत ज्याचे मन निःसंग झाले, आणि यथाप्राप्त शुभाशुभाचा ज्याला आनंद किंवा विषादहि नाही, त्याची बुद्धि स्थिर झाली म्हणायची.**

जो सर्वत्र सदा सरिसा , । परिपुर्णु चंद्रु कां जैसा , ।
अधमोत्तम प्रकाशा-। माजी न म्हणे ।।297।।
ऐसी अनवच्छिन्न [4] समता , । भूतमात्री सदयता , । — 4 संपूर्ण
आणि पालटु [5] नाही चित्ता । कवणे वेळे , ।।298 ।। — 5 बदल
गोमटे [6] काही पावे , । तरी संतोषे तेणे नाभिभवे [7] । — 6 चांगले 7 फुलुन जात नाही
जो वोखटेनि [8] नागवे [9] । विषादासी ।।299।। — 8 अमंगल 9 फसत नाही
ऐसा हरिखशोकरहितु , । जो आत्मबोधभरितु , ।
तो जाण पा , प्रज्ञायुक्तु , । धनुर्धरा ! ।।300।।

**यदा संहरते चायं कूर्मोऽङगानीव सर्वशः ।**
**इंद्रियार्णींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।58।।**
**कासव आपले अवयव ज्याप्रमाणे सर्व बाजुनी आखडून घेतो त्याप्रमाणे एखादा पुरुष इंद्रियांच्या स्पर्शादि विषयापासून आपली इंद्रिये आवरून धरतो तेंव्हा त्याची बुद्धि स्थिर झाली म्हणायची.**

का कूर्म जियापरी , । उवाइला [10] ; अवेव पसरी , । — 10 मनात आले तर
ना तरी , इच्छावशे आवरी । आपुले आपण ।। 301।।
तैसी , इंद्रिये आपैती [11] होती , । जयाचे म्हणितले करिती , । — 11 स्वाधीन
तयाची प्रज्ञा , जाण , स्थिति [12] । पातली [13] असे ।।302।। — 12 स्थीर 13 प्राप्त

**विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिन ः।**
**रतवर्जं रसोप्यस्य परं दृष्ट् वा निवर्तते ।।59।।**

**निराहारी पुरुषाचे विषय सुटले, तरी त्यातील रस म्हणजे गोडी सुटत नाही. पण परब्रह्माचा अनुभव आल्यावर सर्व विषय त्यातील गोडी सुध्दा म्हणजे विषय व त्यातील गोडी दोन्ही सुटतात.**

अर्जुना ! आणिकही एक । सांगेन , ऐके कवतिक [1] ।
या विषयांतें , साधक ।त्यजिती नियमे [2] ।।303।।
श्रोत्रादि इंद्रिये आवरिती , । परी , रसने नियमु न करिती ।
ते सहस्त्रधा कवळिजती [3] । विषयी इही ।।304।।
जैसी , वरिवरि पालवी खुडिजें , । आणि मुळी उदक घालिजें , ।
तरी , कैसेनि नाशु निपजें । तया वृक्षा ? ।।305।।
तो उदकाचेनि बळे , अधिके । जैसा आडवेनि आंगे फाके , ।
तैसा , मानसी विषो पोखे । रसनाद्वारे ।।306।।
येरा [4] इंद्रिया विषय तुटे [5] , ।तैसा , नियमू न ये [6] रस हटे [7] ।
जे , जीवन हे न घटे [8] , ।येणेविण ।।307।।
मग , अर्जुना ! स्वभावे , । ऐसियाही नियमातें [9] पावे ,।
जै , परब्रह्म , अनुभवे ,। होऊनि जाइजे ।।308।।
तै , शरीरभाव नासती । इंद्रिये विषय विसरती , ।
जै , सोहंभाव [10] प्रतीति [11] । प्रगट होय ।।309।।

1 आश्चर्य
2 निश्चयाने
3 बांधतात
4 इतर 5इंद्रियांना विषयापासून आवरतात 6 नियमित करतात येत नाही
7 गोडी कमी होत नाही
8 घडतें 9 नियमीत केले असता
10 मी ब्रह्म हा भाव 11 प्रत्यय

**यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः।**
**इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ।।60।।**

**कारण,केवळ इंद्रियदमनार्थ प्रयत्न करणाऱ्या विद्वानाचे देखील मन, हे कुंतीपुत्रा ही दांडगी इंद्रिये बलात्काराने भलतीकडे ओढून नेतात.**

येऱ्हवी तरी अर्जुना ! । हे आया [12] नये साधना [13] ।
जे राहटताती [14] जतना [15] । निरंतर ।।310।।
जयाते अभ्यासाची घरटी [16] , । यमनियमांची ताटी [17] ।
जे मनाते सदा,मुठी [18] । धरूनि , आहाती । ।311।।
तेही किजती कासाविसी , । या इंद्रियांची प्रौढी ऐसी , ।
जैसी , मंत्रज्ञाते विवसी [19] । भुलवी का ! ।।312।।
देखै , विषय हे तैसे । पावती ऋध्दिसिद्धीचेनि मिषे ।
मग , आकळिती [20] स्पर्शे । इंद्रियांचेनि ।।313।।
तिये संधी [21] मन जाये , । मग अभ्यासी ठोठावले ठाये [22] ।
ऐसे , बळकटपण आहे । इंद्रियांचे ।।314।।

12 स्वाधीन 13 मनोनिग्रह
14 वागतात 15 सांभाळण्याच यत्न करतात 16 पहारा 17 कुंपण
18 ताब्यात ठेवतात
19 हडळ
20 व्यापतात
21 वेळेस 22 थोटे पडते

**तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।**
**वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।61।।**

**म्हणून या सर्व इंद्रियांचे संयमन करून युक्त म्हणजे योगयुक्त व मत्परायण होउन रहावे. आपली इंद्रिये याप्रमाणे ज्याच्या स्वाधीन झाली त्याची बुद्धि स्थिर झाली.**

म्हणौनि , आइके , पार्था ! । यांते निर्दळी जो सर्वथा , ।
सर्व विषयी आस्था ।सांडूनियां , ।।315।।
तोचि तूं जाण । योगनिष्ठेसी कारण , ।
जयाचे विषयसुखे अंतःकरण । झकवेना [1] ।।316।। 1 मोहीत होणे
जो आत्मबोधयुक्तु । होऊनि असे , सततु , ।
जो , माते हृदयाआंतु । विसंबेना , ।।317।।
येऱ्हवी, बाह्य [2] विषय तरी नाही । परी ,मानसी होईल जरी कांहीं ,। 2 बाहेरील
तरी साद्यंतुचि [3] पाही , । संसारु असे ।।318। । 3 संपूर्ण
जेसा कां विषाचा लेशु , । घेतलिया होय बहुवसु [4] । 4 फार
मग निभ्रांत [5] करी नाशु ।जीवितासी ।।319 ।। 5 निश्चित
तैसी , विषयाची शंका । मनी वसती देखा , ।
घातु करी अशेखा । विवेकजाता ।।320।।

**ध्यायतो विषयान्पुंसःसंगस्तेषुपजायतें ।**
**संगात्संजायते कामःकामात्क्रोधोऽभिजायते ।।62।।**
**क्रोधाद् भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।**
**स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।63।।**

**विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषांची त्या विषयांचे ठीकाणी सलगी वाढत जाते, या संगापासून पुढे काम म्हणजे हा विषय प्रप्तीची वासना उत्पन्न होते, आणि हा काम तृप्त होण्यास अडथळा झाला म्हणजे त्या कामा पासून क्रोधाचा उद् भव होतो; क्रोधापासून संमोह म्हणजे अविवेक होतो . संमोहापासून स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशापासून बुद्धिनाश, आणि बुद्धिनाशापासून पुरुषाचा सर्वस्वी घात होतो**

जरी हृदयी विषय स्मरती , । तरी , निसंगाही आपजें [6] संगती । 6 प्राप्त व्हावे असे वाटते
संगे प्रगटे मूर्ती , । अभिलाषाची ।।321।।
जेथ कामु उपजला , । तेथ क्रोधु आधीचि आला , ।
क्रोधी असे ठेविला , । संमोह जाणे ।। 322।।
संमोहा जालिया व्यक्ति , । तरी नाशु पावे स्मृति , ।
चडवातें [7] ज्योति । आहत [8] जैसी ।। 323।। 7 जोराचा वारा
कां , अस्तमानी निशी , । जैसी , सूर्य तेजाते ग्रासी । 8 ताडन केलेला
तैसी दशा , स्मृतिभ्रशी । प्राणियांसी ।।324।।

मग , अज्ञानांध केवळ , । तेणे आप्लविजे सकळ , ।
तेथ बुद्धि होय व्याकुळ । हृदयामाजी ।।325।।
जैसे , जात्यंधा पळणी पावे , । मग ते काकुळती सैरा धावे , ।
तैसे बुद्धिसि होती भवे [1] । धनुर्धरा ! ।। 326।। 1 भ्रमते
ऐसा स्मृतिभ्रंशु घडे , । मग सर्वथा बुद्धि अवघडे , ।
तेथ समूळ हे उपडे । ज्ञानजात ।।327।।
चैतन्याच्या भ्रंशी , । शरीरा दशा जैशी , ।
तैसे , पुरुषा बुद्धिनाशी ।होय , देखै ।।328।।
म्हणौनि , आइके अर्जुना ! ।जैसा , विस्फुलिंग [2] लागे इंधना , । 2 ठिणगी
मग , तो प्रौढ जालिया ; त्रिभुवना ।पुरो शके ! ।।329।।
तैसे , विषयांचे ध्यान , । जरी , विपाये वाहे मन , ।
तरी येसणे हे पतन । गिवसित [3] पावे ।।330।। 3 शोधत येते

**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ।**
**आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ।।64।।**

**पण आपला आत्मा म्हणजे अंतःकरण ज्याच्या ताब्यात आहे तो पुरुष प्रीती व द्वेष यापासून सुटलेल्या व आपल्या स्वाधीन असलेल्या इंद्रियांनी विषयांमध्ये वागूनहि चित्ताने प्रसन्न असतो.**

म्हणौनि , विषय हे आघवे ।सर्वथा मनौनि सांडावे ।
मग रागद्वेष स्वभावे । नाशतील ।।331।।
पार्था ! आणिकही एक , । जरी नाशले रागद्वेष , ।
तरी इंद्रियां , विषयी , बाधक [4] । रमता नाही ! ।।332।। 4 बाधा उत्पन्न करत नाहीत
जेसा , सूर्य आकाशगतु , । रश्मीकरे जगाते स्पर्शतु , ।
तरी संगदोषे काय लिंपतु । तेथिचेनि ? ।।333।।
तेसा , इंद्रियार्थी उदासीन , । आत्मरसेचि निर्भिन्न [5] । 5 तल्लिन
जो कामक्रोध विहीन । होऊनि असे ।।334।।
तरी , विषया , तयां काही । आपणपेवाचूनि [6] नाही । 6 आत्मस्वरूपावाचून
मग , विषय कवण , कायी । बाधितील कवणा ? ।।335।।
जरी उदकी उदक बुडिजें , । का , अग्नि आगी पोळिजें , ।
तरी , विषयसंगे आप्लविजे । परिपूर्णु तो ।।336।।
ऐसा आपणचि केवळु , । होऊनि असे निखळु , ।
तयाचि प्रज्ञा अचळु , । निभ्रांत मानी ! ।।337।।

**प्रसादे सर्वदु ःखानां हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धि ः पर्यवतिष्ठते ।।65।।**

**चित्त प्रसन्न असले म्हणजे त्याच्या सर्व दुःखाचा नाश होतो. कारण ज्याचे चित्त प्रसन्न त्याची बुद्धिहि तत्काल स्थिर होते.**

देखै , अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता , ।
तेथ रिगणे नाही समस्ता । संसारदुःखा ।।338।।
जैसा , अमृताचा निर्झरु , । प्रसवे जयाचा जठरु , ।
तया क्षुधेतृषेचा अडदरु [1] । कहीचिनाही ।।339।। 1 चिंता
तैसे , ह्रदय प्रसन्न होये , । तरी दुःख कैंचे ? के आहें ? ।
तेथ आपैसी बुद्धि राहे । परमात्मरूपी ।। 340।।
जैसा निर्वातीचा दीपु , । सर्वथा नेणे कंपु , ।
तैसा , स्थिरबुद्धि स्वस्वरुपु । योगयुक्तु ।।341।।

**नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।**
**न चाभावयतः शांतिरशान्तस्य कुतः सुखम् ।।66।।**

**जो पुरुष युक्त म्हणजे वरील प्रकारे योगयुक्त झालेला नाही त्याला स्थिर बुद्धि आणि भावना म्हणजे दृढ-बुद्धिरूप निष्ठाहि नसते. ज्याला भावना नाही त्याला शांति नाही, आणि ज्याला शांति नाही त्याला सुख कोठून मिळणार ?**

ये युक्तीची कडसणी [2] । नाही जयाच्या अंतःकरणी । 2 निष्काम काम करण्याचा विचार
तो आकळिला [3] जाण , गुणी । विषयादिकी ।।342।। 3 व्यापला
तया , स्थिरबुध्दि , पार्था ! । कही नाही सर्वथा ।
आणि स्थैर्याची आस्था , । तेही नुपजे ! ।।343।।
निश्चळत्वाची भावना । जरी नव्हेचि , देखै , मना ।
तरी , शांति केवी अर्जुना ! । आपु होय ? ।।344।।
जेथ शांतीचा जिव्हाळा नाही , । तेथ सुख विसरोनि न रिगे कही , ।
जेसा , पापियाच्या ठायी । मोक्षु न वसे ।।345।।
देखै , अग्निमाजी घापती [4] । तिये बीजे जरी विरुढती , । 4 घातलेली
तरी , अशांता सुखप्राप्ती ।घडो शके ।।346।।
म्हणौनि , अयुक्तपण मनाचे , । तेचि सर्वस्व दुःखाचे , ।
या कारणे इंद्रियांचे । दमन निके ।।347।।

**इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।**
**तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नांवमिवांभसि ।।67।।**

**विषयांत संचरणाऱ्या म्हणजे वागणाऱ्या इंद्रियांच्या मागोमाग जे जाऊ लागते तेच पाण्यात नौकेस जसा वारा , त्याप्रमाणे पुरुषाची बुध्दि हरण करीत असते.**

इंद्रिये जे , जे, म्हणती , ।ते , तेचि , जे पुरुष करिती , ।
ते , तरलेचि न तरति , । विषयसिंधु ।।348।।
जेसी नाव थडिये [1] ठाकितां , ।जरी वरपडी [2] होय दुर्वाता [3] । 1 कीनारा 2उपस्थित 3वाईट वारा
तरी चुकालाही [4] , मागौता [5] । अपावो पावे ।।349।। 4 टळलेले 5पुनः
तैसी , प्राप्तेही पुरुषे , । इंद्रिये लाळिली , जरी कौतुके , ।
तरी , आक्रमिला जाण , दुःखे । संसारिके ।।350।।

**तस्माद्यस्य महाबाहो निगृहितानि सर्वशः ।**
**इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।68।।**
**म्हणून हे माहाबाहो अर्जुना !इंद्रियांच्या विषयापासून ज्यांची इंद्रिये सर्व बाजूंनी आंवरून धरिलेली असतात त्याचीच बुद्धि स्थिर झाली म्हणायची.**

म्हणौनि , आपुली आपणपेया , । जरी इंद्रिये येती आया [6] । 6 स्वाधीन
तरी अधिक , काही धनंजया ! ।सार्थक असें ? ।।351।।
देखै , कूर्म जियापरी ।उवाइला , अवेव पसरी , ।
ना तरी , इच्छावशे , आवरी । आपणपेचि ।।352।।
तैसी इंद्रिये आपैती होती , । जयाचे म्हणितले करिती , ।
तयाची प्रज्ञा ,जाण , स्थिती । पातली असें ।।353।।
आतां , आणिक एक गहन , । पूर्णाचे चिन्ह ।
अर्जुना ! तुज सांगैन , । परिस पां ! ।।354।।

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।।69।।**
**सर्व लोकांना जी रात्र, तेथं स्थितप्रज्ञ जाग्रुत असतो आणि सर्व प्रणिमात्र जेथे जागृत असतात तेथे या ज्ञानवान पुरुषास रात्र वाटत असते**

देखै , भूतजात निदेले , । तेथेचि जया पाहले [7] । 7 पहाट
आणि , जीव जेथ चेइले , । तेथ निद्रितु जो , ।। 355।।
तोचि तो निरुपाधि । अर्जुना ! तो स्थिरबुध्दि ।
तोचि जाणे निरवधि ।मुनीश्वर ।।356।।

**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।**
**तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ।।70।।**
**चोहोकडून पाण्याने भरतानाही ज्याची मर्यादा चळत नाही, अशा समुद्रात सर्व पाणी ज्याप्रमाणे शिरत असते तद्वत् ज्या पुरुषात सर्व विषय त्याची शांती न मोडता प्रवेश करितात, त्यालाच खरी शांती मिळते.विषयेच्छुला नाही**

पार्था ! आणकिही परी । तो जाणो येईल , अवधारी ।
जैसी , अक्षोभता सागरी । अखंडित ।।357।।
जऱ्ही सरितावोघ समस्त , । परिपूर्ण होऊनि मिळत , ।
तऱ्ही , अधिक नोहे ईषत्[1] , । मर्यादा न संडी ।।358।। 1 सागर
ना तरी , ग्रीष्मकाळी सरिता । शोषूनि जाती समस्ता , ।
परी न्यून नव्हे , पार्था ! ।समुद्र जैसा ।359।।
तैसा , प्राप्ती ऋध्दिसिध्दी , । तयासि क्षोभु नाही बुद्धि , ।
आणि , न पवता , न बाधी । अधृति [2] तयाते ।। 360 2 अधेर्य
सांगै , सूर्याच्या घरी । प्रकाशु काय वातीवेरी [3] ? । 3 ज्योतीने
कां , न लविजें , तरी अंधारी । कोंडेल तो ? ।।361।।
देखै , ऋध्दिसिध्दि तयापरी । आली गेली , से [4] न करी । 4 आठवण
तो विगुंतला [5] असे , अंतरी । महासुखी ।।362।। 5 रमला
जो आपुलेनि नागरपणे [6] , । इंद्रभुवनाते पाबळे [7] ! म्हणे , । 6 सौंदर्याने 7 तुच्छ
तो , केवीं रंजे पालिवणे [8] । भिल्लांचेनि ? ।।363।। 8 पानाचे झोपडे
जो अमृतासी ठी ठेवी [9] , । तो जैसा कांजी न सेवी , । 9 नांव ठेवणे
तैसा स्वसुखानुभवी , । न भोगी ऋध्दि ।।364।।
पार्था ! नवल हे पाही , । जेथ स्वर्गसुख लेखनीय [10] नाही , । 10 खिजगणतीत
तेथ ऋध्दिसिध्दि कायी। प्राकृता होती [11] ?।।365।। 11 विचारतो कोण

**विहाय कामान्यः सर्वान्पुमाश्चरति निःस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारः स शातिमधिगच्छति ।।71।।**

**सर्व काम म्हणजे आसक्ति सोडून जो पुरुष निःस्पृह होऊन व्यवहारात वागतो व ,ज्याला ममत्व व अहंकार नाही त्यालाच शांति मिळते !**

ऐसा , आत्मबोधे तोषला , । जो परमानंदे पोखला [12] । 12 तुष्ट झाला
तोचि स्थिरप्रज्ञु भला । वोळख तूं ।।366।।
तो अहंकाराते दंडुनि , । सकळ कामु सांडोनि , ।
विचरे [13] विश्व होऊनी , । विश्वामाजी ।।367।। 13 संचार करणे

**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।**
**स्थित्वास्यामंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ।।72।।**

**हे पार्था! ब्राह्मी स्थिति म्हणतात ती हीच. ही प्राप्त झाल्यावर कोणीहि मोहात पडत नाही; आणि अंतकाळी म्हणजे मरणाच्या वेळी सुध्दा या स्थितीमध्ये राहून त्याला ब्रह्मनिर्वाण म्हणजे ब्रह्मात मिळण्याचा मोक्ष मिळतो.**

हे ब्रह्मस्थिति निःसीम , । जे अनुभविता , निष्काम ।
ते , पावले परब्रह्म । अनायासे ।।368।।
जे , चिद्रूपी मिळता । देहांतीचि व्याकुळता , ।
आड ठाको न सके , चित्ता , । प्राज्ञा ! जया ।।369।।
तेचि हे स्थिति । स्वमुखे श्रीपति ।
सांगत , अर्जुनाप्रति । संजयो म्हणे ।।370।।
ऐसे कृष्णवाक्य ऐकिले , । तेथ , अर्जुने मनी म्हणितले ।
'' आतां आमुचियाचि काजा कीर आलें , । उपपत्ति इया ।।371।।
जे , कर्मजात आघवे , । एथ निराकारिले देवे , ।
तरी पारुषले [1] म्यां झुंजावे । म्हणौनिया '' ।।372।।
ऐसा श्रीअच्युताचिया बोला , । चित्ति धनुर्धरु उवाइला [2] ।
आतां , प्रश्नु करील भला । आशंकोनी [3] ।।373।।
तो प्रसंगु असे नागरु [4] । जो सकळ धर्मासी आगरु [5] ।
की , विवेकामृतसागरु ।प्रांतहीनु ।।374।।
जो , आपण सर्वज्ञनाथु , । निरुपिता होईल श्रीअनंतु ।
ज्ञानदेवो सांगेल मातु । निवृत्तिदासु ।।375।।

1 खुंटले
2 प्रसन्न झाला
3 आशा ठेवून
4 उत्तम 5 साठा

**इति श्रीमद्भगद्भगीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽ ध्यायः ।।2।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

71. नाजुक अशा हृदयाच्या मर्मस्थानी, कारुण्याची पूर्ण भरतीची वेळ आहे. अशी संधी साधून त्या महामोहरुपी काळसर्पाने त्याला दंश केला (सर्प हा शरीराच्या नाजुक भागी ऐन भर तिन्ही सांजेच्या वेळी चावला तर सर्पाचे विष उतरणे कठीण असते) त्यामुळे त्या लहरी उतरतच नव्हत्या.

104 तुम्ही,आम्ही व हे भूपती नित्य आहोत. तसेच राहू किंवा कायमचे नाश पावू, या दोन्ही गोष्टी भ्रममूलक आहेत. तो भ्रम जर नाहीसा झाला तर यापैकी एकही खरे नाही असे कळून येईल.

193. तुझ्या गुणावर लुब्ध होऊन प्रेमभराने तुजवर अतिशय आसक्त झाल्यामुळे ही कीर्तीरुपी स्त्री उत्कट इच्छेने तुला स्वयंवरामध्ये माळ घालून वरण्यास आलेली आहे.

196. आता हे समोर असलेले धर्मयुध्दाचे कर्तव्य टाळावयाचे आणि जो विषय आता तुझ्यासमोर नाही त्या भलत्या विषयाबद्दल शोक करीत बसणे हे आपली आपण हानी करुन घेण्यासारखे आहे.

213. असा त्या तुझ्या कीर्तीचा महिमा गंगेच्या पाण्याप्रमाणे निर्मळ व गहन आहे. आणि तो पाहून व ऐकुन जगातील मोठ मोठ्या योध्यांना कीर्ती संपादन करण्याचा तो एक मार्ग झाला आहे.

282. आता आणखी ज्ञान मिळवावे किंवा पूर्वी मिळविलेले ज्ञान पुनः आठवावे हे सर्व अर्जुना ! सहजच थाबेल.